म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय नाटक
दा. क्र. २६७
ता. १८९८

२६७ सन १८९८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

(ठाणें जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.

पु० नांव – भामाविलास
ले – जोगळेकर
१८८
सं. क्र.
१८

नाटक

TO

# SITTÁRÁM RAGHUNÁTH ADHIKÁRY

STEWARD OF THE GOCULDASS TEJPAL HOSPITAL,

PROPRIETOR OF THE MANURE WORKS BOMBAY,

AND PROPRIETOR OF THE "ARYAWARTA

PANCHANAN" BI-WEEKLY MARATHI

NEWS-PAPER, BOMBAY.

&c. &c.

THIS WORK IS

MOST RESPECTFULLY DEDICATED

BY

THE AUTHOR.

रा. रा. शिताराम रघुनाथ अधिकारी,

गोकुळदास तेजपाळ इस्पितळचे स्टयुअर्ड आणि

खताच्या कारखान्याचे व "आर्यावर्त—पंचानन"

नामक मुंबई येथील मराठी वर्तमान-

पत्राचे मालक, इ० इ०,

यांस हें पुस्तक

परमादरानें

नजर केलें असे.

ग्रंथकर्ता.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं०
ठाणे

# प्रस्तावना.

इंग्लिश लोकांचें राज्य या देशांत झाल्यापासून आमच्या भाषेचा दिवसेंदिवस अधिकाधिक उत्कर्ष होऊं लागला आहे ही आनंदाची गोष्ट होय. जितक्या मानानें एखादे भाषेंत मनोरंजक व उपयुक्त पुस्तकांची संख्या वाढत जाईल, तितक्या मानानें ती भाषाही जनप्रिय विशेष होते, हें निर्विवाद आहे. एतदर्थ प्रत्येक भाषोत्कर्षकानें तत्संबंधीं प्रयत्न करणें हें रास्त आहे. असें जाणून व आपल्या महाराष्ट्र भाषेचा उत्कर्ष व्हावा या हेतूनें, हें लहानसें पुस्तक नाटकरूपानें विद्वज्जन सेवनार्थ मी अल्प मतीनें तयार केलें आहे; तरी त्यांतील दोषांकडे अलक्ष करून ते गूण ग्रहण करतील अशी आशा आहे. कोणीच सर्व गुणसंपन्न नसतो, यावरून या पुस्तकांत दोष राहिले असतील यांत संशय नाहीं; तरीही तसें होऊं नये ह्मणून मी शक्त्यनुसार प्रयत्न करणें ठेविलें नाहीं. निरुपायानें हें पुस्तक मुदतीवर तयार झालें नाहीं, तथापि सूज्ञ वर्गणीदार त्याकरितां क्षमा करतील अशी आशा आहे. माझ्या गरीब स्थितीमुळें व दुसऱ्या अनेक कारणांनीं विलंब लागण्याचा संभव होताच ह्मणून मी त्याबद्दल अपराधी आहें असें कोणासही वाटणार नाहीं. या पुस्तकास योग्याश्रय मिळाल्यास पुढें दुसरें ल-

वकरच तयार करून जनहितार्थ प्रयत्न करण्याचा माझा विचार आहे व देशहितेच्छू आणि मुख्यत्वें शौकी व भाषोत्कर्षेच्छू लोक ह्या कामी आपलें कर्तव्याला अनुसरून उदारत्व प्रगट करतील अशी खात्री आहे. युरोपांतील सुधारलेल्या राष्ट्रांतून पुस्तकांची चहा विशेष असते व एखादें पुस्तक तयार झाल्यास त्यांतील तथ्य घेण्यांत तेथील लोक फार उत्कंठित असतात, त्यामुळें पुस्तकांची संख्या वाढून लोकांत ज्ञान व सौख्य यांचें मान विशेष होतें. मनोरंजक पुस्तकाच्या वाचनानें अनेक उपद्व्यापापासून मलीन (साचेंत) झालेलें मन शुद्ध होतें आणि मन शुद्ध झाल्यावर मनांत सुविचार तरंग उद्भवतात व त्यायोगें हित होतें; शिवाय मन शुद्ध झाल्यापासून शरीराचेंही हित होतें. यावरून मनोरंजक पुस्तकांचा किती उपयोग आहे व तीं आश्रयाला किती पात्र आहेत, हें उघड झाले. तरी माझ्या स्तुत्य उद्योगाचें सार्थक होईल अशी मी आशा करणें गैरशिस्त होणार नाहीं असें मला वाटतें.

दत्तात्रय वासुदेव जोगळेकर.

मुंबई, तारीख १ ली नोवेंबर सन १८७७.

७१ १९

# भामाविलास नाटक.

### मंगलाचरण.

### श्लोक.

(शिखरिणी).

नमस्ते विश्वेशा भुवनजनका निर्मलगुणा ॥
नमो धर्मोद्धारा विमल चरिता सर्व निपुणा ॥
कृपा आहे तूझी तरिच नर होईल विजयी ॥
असें जाणोनीयां स्मरत तुजला कार्य समयीं ॥ १ ॥

(मंगलाचरण झाल्यावर सूत्रधार प्रवेश करितो).

**सूत्रधार**— (सभेकडे पाहून) आर्य हो, आपल्या आज्ञेप्रमाणें आतां या रंगभूमीवर नाटकाचा प्रयोग करून दाखवितों. कृपा करून यांतील गुणांचें ग्रहण करून दोषांचा त्याग कराल अशी आशा आहे. (पडद्याकडे पाहून) मित्रा नटा, त्वरेनें प्राप्त हो.

**विदूषक.**– ( प्रवेश करून ) बोला बोला, काय ह्मणतां! तुह्मी "प्राप्त हो" असें ह्मणतांच आप्तवर्गांच्या मध्यभागीं सुषुप्तावस्थेंत होतों तो एकदम आलों. काय काम असेल तें लौकर सांगा. नाहीं तर फावल्या वेळांत झोंप घेण्याचा बेत आहे त्यांत व्यत्यय येईल व निद्रेचा क्षोभ होईल.

**सूत्रधार.**–विदूषका, ( सभेकडे हात करून ) हे सर्व सभ्य आपणांस काय आज्ञा करतात हें तुला समजलें काय?

**विदूषक.**– महाराज, आपण सांगण्याच्या आधींच येथला थाट पाहून समजलों. आतां आपण आज्ञा कराल तसें वागलें पाहिजे हेंही मी समजतों. काय आज्ञा आहे? लवकर सांगा.

**सूत्रधार.**– अरे आपणास आज "भामाविलास" या नांवाचें नाटक करावयाचें आहे तर नेपथ्यांत जाऊन सर्व पात्रांची तयारी कर.

**विदूषक.**–कायहो, आज हा नवीनच भाग कोठून काढलात?

**सूत्रधार**–आजपर्यंत या विद्वज्जनांनीं अनेक नाटकें अवलोकन केलीं आहेत हें तुला ठाऊकच आहे. पाहिलेल्या वस्तूची वारंवार पहाण्यास अभिरुची लागत नाहीं याकरितां हा श्रीमद्भागवताधारें रचलेला प्रबंध आपण करूं.

**विदूषक.**–अहो नाटकाचार्य, या कथेचा थोडाबहुत सारांश जर आमच्या कानावरून घसरून जाईल तर बरें असें मला वाटतें.

**सूत्रधार.**–विदूषका, तुला ठाऊकच आहे; कृष्णास आठ पट्ट-

राण्या होत्या त्यांत रुक्मिणीचा व सत्यभामेचा मानपानाविषयीं वरचेवर कलह होत असे. एकेदिवशीं नारदानें इंद्रलोकांतून एक पारिजातकाचें पुष्प आणून गोपालकृष्णास दिलें, तें पुष्प कृष्णानें स्वाभाविक रीत्या, रुक्मिणीस अर्पण केलें असतां कलहप्रिय नारदास कलह लावण्यास ही उत्तम संधी आहे, असें वाटून त्याणें तें मत्सरोद्भव करणारें वर्तमान सत्यभामेस सांगितलें, त्यावरून सत्यभामा दुःखित झाली. इतक्यांत तेंच पुष्प वेणींत गुंफून रुक्मिणी तिच्या मंदिरांत आली, त्यावेळेस दोघींचा कलह झाला. नंतर कृष्णानें "तुझ्या दारांत पारिजातकाचा वृक्ष लावीन" असें सत्यभामेस सांगून तिची समजूत केली. पुढें प्राग्ज्योतीषपुरीचा भोमासूर मदोन्मत्त होऊन त्याणें अदितीचीं (देवमातेचीं) किरीटकुंडलें हरण केलीं ह्मणून इंद्र कृष्णास शरण आला, तेव्हां सत्यभामेसहवर्तमान कृष्ण त्याच्या नगरांत जाऊन त्याचा वध केला. आणि त्याणें प्रतिबंधांत ठेवलेल्या सोळा हजार राजकन्यांचें पाणिग्रहण करून देवमातेचीं किरीटकुंडलें देण्याकरितां इंद्रलोकीं गेला. त्या ठिकाणीं नंदनवन पहात असतां सत्यभामेस पारिजातकाचें स्मरण झालें ह्मणून कृष्ण तो वृक्ष उपटीत असतां वनरक्षकानें इंद्रास "तस्कर येऊन पारिजातकाचा वृक्ष नेतो." असें सांगितल्यावरून इंद्र तस्कराला शासन करावें या हेतूनें बाण सोडीतच

आला. क्षणैक उभयतांचें युद्ध होत आहे तों हें वर्तमान बृहस्पतीस समजलें व त्याणें दोघांचें शांतवन करून कृष्णास पारिजातकाचा वृक्ष अर्पण केला. इत्यादि. हा कथाभाग फारच मनोरम असल्याकारणानें याचीच योजना केली आहे. तर जा आणि सांगितलेलें काम लौकर कर, तोंपर्यंत मी गणेश सरस्वतीचें आवाहन करतों.

**विदूषक.**—ठीक आहे, जातों तर (निघून जातो).

**सूत्रधार.**—(गणपतीचें स्मरण करतो.)

## श्लोक.

(विबुधप्रिया)

घेउनी फरशांकुशा करिं भक्त रक्षिसि आ-
पुले ॥ देशि त्यां वरदान संकटिं धांवसी
जरिं आंचलें ॥ कीर्ति यापरि ऐकुनी तुज
बाहतो करुणास्वरें ॥ येइ लौकर मोरया
मज दर्शनाप्रति दे त्वरें ॥ १ ॥

## श्लोक.

(भुजंगप्रयात.)

करीं मंगलातें गणेशा त्वरेनें ॥ हरीं विघ्न-

राशी कुबुद्धी लया ने ॥ न कांहींच जाणें तुझें स्तौत्य देवा ॥ परी शुद्धभावें स्मरें दे विसावा ॥ १ ॥

( याप्रमाणें स्तुती करीत असतां गणपती प्रवेश करतो त्यास पाहून. )

हे मंगलोदय, विघ्नांतक, शिवसूत, नागानना, हा दासानुदास वंदन करतो. ( चरणावर मस्तक ठेवतो).

**गणपती.**—वत्सा भारता, तुझें सदैव कल्याण असो. दासा, करुणास्वरानें कां हांक मारलीस बरें ?

**सूत्रधार.**—महाराज, मी या ठिकाणीं विद्वज्जन मनरंजनार्थ नाटक करणार, परंतु या सुकर्मास आड येणारे कोटिशः विघ्नसमूह अवलोकन करून भयग्रस्त होत्सातां आपणांस हाक मारली आहे. संकटांतून मुक्त करावें.

**गणपती.**—बालका, तुझ्या नाटकांत विघ्नें येणार नाहींत हा माझा पूर्ण आशीर्वाद आहे. आतां मी गमन करितों.

**सूत्रधार.**—महाराज, वरचेवर दर्शन देऊन संकटांतून सोडवावें. वंदन करतों.

**गणपती.**—बालका, सुखी रहा. ( अंतर्ध्यान पावतो व सूत्रधार सरस्वतीची स्तुति करूं लागतो).

सूत्रधार.—

## श्लोक.

( इंद्रवज्रा ).

गाती जिला नारद तुंबरादी ॥ व्यासादि जितें वदती अनादी ॥ बुद्धीस दे जी सुरभूसुरांते ॥ जी देवता पूज्य हरिहरांते ॥ १ ॥ ती माय येथें जरि भेट देई ॥ सिद्धीस हें लौकर कार्य जाई ॥ जाणोनि अंबे स्तवितों सुभावें ॥ येवोनियां त्वां वरदान द्यावें ॥ २ ॥

(सरस्वती प्राप्त होते तिला पाहून) माते शारदे, वंदन करितों.

**सरस्वती.**—वत्सा सूत्रधारा, तुझें कल्याण असो. अरे तुझी करुणावाणी श्रवण करून मयूरारूढ होत्साती फार वेगानें या रंगमंडपांत प्राप्त झाल्यें. बाळा कोणत्या संकटांत आहेस बरें?

**सूत्रधार.**—आई, (सभेकडे हात करून) या सर्व सभ्यांनीं मला "नाटक करून दाखीव" अशी आज्ञा केली. यांचें चित्तरंजन करावें हें माझें कर्तव्य; परंतु नाटकपात्रें अज्ञान त्यांच्या वाग्विलासानें यांचीं मनें प्रसन्न होणार नाहींत असें जाणून तुझी स्तुति केली.

**सरस्वती.**—बालका, तुझीं नाटकपात्रें सुरस भाषणेंकरून या सभाजनांचीं मनें प्रसन्न करतील हा माझा खास आशीर्वाद

आहे. आतां मी ब्रह्मलोकीं गमन करतें. जेव्हां तुला संकट पडेल तेव्हां स्मरण कर ह्मणजे तत्काळ संकटांतून सोडवीन.

**सूत्रधार.**—मातोश्री, अशीच कृपा असावी. वंदन करतों (नमतो).

**सरस्वती.**—बालका, विजयीभव. (अंतर्ध्यान पावते.)

**विदूषक.**—(धांवत येऊन) कायहो, किती उशीर? "पानें वाढून तयार झालीं आहेत" अशी तुमच्या घरांतून वर्दी आली तरीं तुमच्यानें येववत नाहीं हें काय? किती आळस करतां! लवकर चला.

**सूत्रधार.**—ए बडबड्या थोडें बोल. शब्दवर्षाव किती करतोस? पानें कसलीं वाढलीं!

**विदूषक.**—मला काय ठाऊक? तुह्मी आपल्या बायकोला काय सांगितलें होतेंत तें.

**सूत्रधार.**—मूर्खा, "नाटकपात्रांची सिद्धता आहे" असें तिनें सांगून पाठविलें असेल.

**विदूषक.**—तसें कां होईना? चला ह्मणजे झालें.

**सूत्रधार.**—(सभेकडे पाहून) श्रेष्ठ हो, आतां एकाग्र मनें करून नानाप्रकारच्या स्थलांतरांतील चरित्रें पहाण्यास तयार व्हा. (पडद्यापलीकडे शब्द होतो) "द्वारकावासी यदुनाथ गोपालकृष्णकी स्वारी आती है, नजर रखो मेहेरबान!"

**विदूषक.**—(ऐकून व भय पाऊन) अहो सूत्रधार! संभाळा मला; घोटाळा दिसतो सगळा.

सूत्रधार.—विदूषका, भिऊ नको. अरे, जो भक्तकामकल्प-द्रुम, जगद्वंद्य, धर्मस्थापक गोपालकृष्ण, तो आतां आपल्या भक्तमंडळासह येत आहे. याकरितां आपण निघून जाऊं.

(दोघे निघून जातात.)

---

# प्रवेश १ ला.

स्थळ—द्वारकेंतील कृष्णसभा.

## पात्रें.

कृष्ण, उद्धव, अक्रूर, नारद, चोपदार इत्यादी.

(सर्व बसले असतां पडदा उघडतो.)

(इतक्यांत नारद प्रवेश करतो त्यास पहातांच सर्व उभे राहून नमतात.)

कृष्ण.—यावें देवमुने! हें आसन. (आसन दाखवितो) बसावें महाराज.

नारद.—गोपालकृष्णा, सर्वांसह तूंही बैस. (सर्व बसतात.)

कृष्ण.—नारदस्वामी, आपल्या आगमनानें ही सभा पवित्र झाली व आमचे नेत्रही धन्य झाले. महाराज, कांहीं प्रश्न करून आपलीं शब्दमौक्तिकें कर्णसंपुटांत सांठवावीं; अशी इच्छा झाली आहे.

नारद.—यादवेश्वरा, जी इच्छा झाली आहे, ती पूर्ण करून घे; मी सांगण्यास सिद्ध आहें.

कृष्ण.—मुनिवर्य, आपण इच्छामात्रेंकरून नित्य त्रैलोक्यांत भ्रमण करीत असतां. अवनी वरील सर्व चमत्कार आपल्या पहाण्यांत येतात; तर कृपा करून कांहीं ऐकावें अशी इच्छा आहे.

नारद.—गोपालकृष्णा, आज प्रातःकाळीं, स्नानसंध्या आदि करून आन्हिक आटोपल्यावर, स्कंदावर ब्रह्मविणा धारण केला आणि नारायण नामाचा उच्चार करीत करीत जाऊन पित्याचें दर्शन घेतलें. नंतर वैकुंठास गेलों त्या ठिकाणीं शुभ्र पर्यंकावर श्रीविष्णू निद्रिस्त होते, कमला मातोश्री पादसंवाहन करीत होती, त्या उभयतांचे दर्शनानंतर तेथील आनंददायक शोभा पहात पहात कैलास पर्वतावर गेलों. आहाहा! काय त्या पर्वताची शोभा तुला सांगूं? कर्पुराप्रमाणें शुभ्र, वनोपवनांनीं युक्त, अनेक सरोवरांनीं मंडित असा कैलास पाहून मनाला अतिशयच आनंद झाला. त्या ठिकाणीं सरूपता मुक्ती पावलेले सर्व शिवभक्त, ज्यांचीं स्वरूपें शिवासारखींच आहेत, त्यांस पहात पहात वटवृक्षाचे छायेस उमामहेश्वराचा जोडा बसला होता. त्यांचाही दर्शनलाभ झाला. नंतर ईश्वर निर्मित अनेक स्थळें पहात पहात अमरावतीस गेलों. मला पहातांच सर्व देवांसह इं-

द्रानें उत्थापनपूर्वक षोडशोपचारानें माझी पूजा केली, त्या पूजेंत एक अमोलिक पारिजातकाचें पुष्प अमरेश्वरानें मला अर्पण केलें. तें पुष्प हातांत घेऊन निघालों तों अवनी पहाण्याची इच्छा झाली. नंतर मनांत विचार केला कीं, पृथ्वीवर महान् धार्मिक, सत्यवादी, नयशील, असे पुष्कळ नृपती आहेत; परंतु सर्व गुण संपन्न, या पुष्पाचा भोक्ता, गोपालकृष्णच होय त्याला हें अर्पण करावें. अशा मानसिक विचाराप्रमाणें आधीं तुजकडेच प्राप्त झालों हें पुष्प ग्रहण कर. (फूल देतो.)

**कृष्ण.**—(पाहून) आहाहा! नारदस्वामी, जी वस्तू देवलोकीं आहे, तरींही देवांस दुर्लभ, ती आपण मोठ्या प्रीतीनें मला अर्पण केलीत; तर हे आपले उपकार मी कोणत्या रीतीनें फेडावे बरें!

**नारद.**—कृष्णा, ह्या पुष्पादीक कामोद्दीपन करणाऱ्या वस्तू आमच्या मुनिजनांच्या उपयोगाच्या नव्हत; ह्मणून हें मी तुला दिलें. यांत उपकार कशाचा? असो. आतां मी गमन करतों. (उठतो).

**सर्व**—(नमून) महाराज वरचेवर दर्शन देत असावें.

**नारद.**—ठीक आहे. (जातो) (सर्व बसतात.)

**कृष्ण.**—उद्धवा, हें पुष्प किती कोमल आहे पाहिलेंस? ( दाखवितो ).

उद्धव.—देवा, याचा कोमलपणा उत्तम आहे यांत आश्चर्य नाहीं; कारण हें एक सागरोद्भव रत्नच होय.

कृष्ण.—आपण आजपर्यंत नानाप्रकारचीं पुष्पें अवलोकन केलीं; परंतू असा कोमलपणा कोणत्याही पुष्पाच्या अंगीं पहाण्यांत आला नाहीं. असो, सभा विसर्जन करा. मी रुक्मिणीच्या मंदिरांत जातों. ( उठतो )

( सर्व उभे रहातात व कृष्ण गेल्यावर निघून जातात आणि पडदा पडतो. )

## प्रवेश २ रा.

स्थळ—द्वारका, रुक्मिणीच्या सदनाचा मार्ग.

### पात्रें.

पेंद्या, कृष्ण, नारद.

(पेंद्या खांद्यावर घोंगडी घेऊन लंगडत लंगडत येतो ).

पेंद्या.—कालपाथून दो बापाच्या पोलाला, कुत्याला सोत्तों, पन लेकाता कुथ्थे मिलत नाहीं; आतां तो श्लीमंत धाला; भेतत नाईं! ( इकडे तिकडे फिरतो ).

कृष्ण.—( प्रवेश करतांच त्याला पाहून ) कोणरे तो! पेंद्या.

पेंद्या.—लाम लाम पातील, काय लाव, तुमतीत गातवी पलना.

कृष्ण.—केंव्हा आलासरे!

**पेंद्या.**–अल त्रिया, कालपुन तुला धुंतोया. आतां कुते ताला-तले? (त्याच्या हातांतील फूल पाहून) तुज्या हातांत कायले हें?

**कृष्ण.**–हें पारिजातकाचें पुष्प, नारदस्वामींनीं मला दिलें. आतां मी रुक्मिणीस नेऊन देतों.

**पेंद्या.**–तल मग मी थत्यभामा वैनीत्या चली दाऊन, तिला थांगतों. मंजे ती तुजी खोल मोलील.

**कृष्ण.**–सत्यभामा माझें काय करीलरे?

**पेंद्या.**–लेका, तुलीतल्या दलक्या लाकलांनीं मालील.

**कृष्ण.**—वाहवारे शहाणा! अरे, हें पुष्प मी सत्यभामेलाच देणार आहें.

**पेंद्या.**–अले वेल्या, मी लुकमिन वैनीलात थांगनाल आहें.

**कृष्ण.**—बरें पेंद्या, आतां मी देवकीच्या मंदिरांत जातों. मला मुळींच स्त्रियांकडे जाणें नाहीं. तूं सुद्धां तिकडेच ये बरें! (जाऊं लागतो.)

**पेंद्या.**—(त्यास धरून) अओ तुमी; कुते ताल्रेत? सोद्या, मला थाप देतो अं!

**कृष्ण.**—पेंद्या, तूं आपला गडीना? सोड बरें; मला काम आहे, जाऊं दे.

**पेंद्या.**—अले हो, थाऊक आहे काम कलनाला, कुते तली एकाद्या थिकानीं मदा मालित बत्तीलनी थांगतिल कीं, भक्ताला थोलवाला गेलों होतों.

कृष्ण.—मी बोललों, हें तुला खोटेंच वाटलें तर?

पेंद्या.—खलें कोन ह्मनेल बाबा!

कृष्ण.—अरे, बलरामदादांचा निरोप आईला सांगायाचा आहे तो लौकर सांगितला पाहिजे ह्मणून जातों. आतां बलरामदादा सुद्धां इकडूनच येणार आहेत; त्यांणीं तुझ्याबरोबर मला खेळतानां पाहिलें, तर दोघांसही रागें भरतील. तिकडे आईच्या घरीं येऊन भेट, ह्मणजे चार घटका बोलत बसूं.

पेंद्या.—असें काय? बलामदादाची भीति थांगतोत, मून दा (सोडतो) (कृष्ण जातो व विणा वाजवीत नारद प्रवेश करतो त्या विण्याच्या घोराचा नाद ऐकून) भुले, भुले, भुले, भुले, ये. वाँय्, वाँय्, वाँय्, ये. (पुढें जातो.)

नारद,—अरे, दूर उभा रहा. पेंद्या.

पेंद्या.—ओ, मादी ह्मैत थोलून दे; तंबुल्यांत आहे ती.

नारद.—वेड्या, ह्मैस तंबुऱ्यांत कशी राहील?

पेंद्या.—आहे, खलें मी तिला ओललतानां आत्तां आईकलें.

नारद.—अरे, तंबुऱ्याची तार वाजते ती. तूं फार शहाणा ह्मणून ह्मैस ओरडल्या प्रमाणें ऐकूं येतें समजलास? आईक. (तंबुरी वाजवून दाखवितो.)

पेंद्या.—अले वाले वा! तांगलें वात्तें हें! बलें कद्देदलालबुवा, कुते तालेत बलें?

**पेंद्या.**–अल बिया, कालपुन तुला धुंतोया. आतां कुते ताला-तले? (त्याच्या हातांतील फूल पाहून) तुज्या हातांत कायले हें?

**कृष्ण.**–हें पारिजातकाचें पुष्प, नारदस्वामींनीं मला दिलें. आतां मी रुक्मिणीस नेऊन देतों.

**पेंद्या.**–तल मग मी थत्यभामा वैनीत्या घली दाऊन, तिला थांगतों. मंजे ती तुजी खोल मोलील.

**कृष्ण.**–सत्यभामा माझें काय करीलरे?

**पेंद्या.**–लेका, तुलीतल्या दलक्या लाकलांनीं मालील.

**कृष्ण.**—वाहवारे शहाणा! अरे, हें पुष्प मी सत्यभामेलाच देणार आहें.

**पेंद्या.**–अले वेल्या, मी लुकमिन वैनीलात थांगनाल आहें.

**कृष्ण.**—बरें पेंद्या, आतां मी देवकीच्या मंदिरांत जातों. मला मुळींच स्त्रियांकडे जाणें नाहीं. तूं सुद्धां तिकडेच ये बरें! (जाऊं लागतो.)

**पेंद्या.**—(त्यास धरून) अओ तुमी; कुते तालेत? थोद्या, मला थाप देतो अं?

**कृष्ण.**—पेंद्या, तूं आपला गडीना! सोड बरें; मला काम आहे, जाऊं दे.

**पेंद्या.**—अले हो, थाऊक आहे काम कलनाला, कुते तली एकाद्या थिकानीं मदा मालित बत्तीलनी थांगतील कीं, भक्ताला थोलवाला गेलों होतों.

**कृष्ण.**—मी बोललों, हें तुला खोटेंच वाटलें तर!

**पेंद्या.**—खलें कोन म्हनेल बाबा!

**कृष्ण.**—अरे, बलरामदादांचा निरोप आईला सांगायाचा आहे तो लौकर सांगितला पाहिजे म्हणून जातों. आतां बलरामदादा सुद्धां इकडूनच येणार आहेत; त्यांणीं तुझ्याबरोबर मला खेळतानां पाहिलें, तर दोघांसही रागें भरतील. तिकडे आईच्या घरीं येऊन भेट, म्हणजे चार घटका बोलत बसूं.

**पेंद्या.**—असें काय? बलामदादाची भीति थांगतोस, मून दा (सोडतो) (कृष्ण जातो व विणा वाजवीत नारद प्रवेश करतो त्या विण्याच्या घोराचा नाद ऐकून) भुले, भुले, भुले, भुले, ये. वाँय्, वाँय्, वाँय्, ये. (पुढें जातो.)

**नारद,**—अरे, दूर उभा रहा. पेंद्या.

**पेंद्या.**—ओ, मादी म्हैत थोलून दे; तंबुल्यांत आहे ती.

**नारद.**—वेड्या, म्हैस तंबुऱ्यांत कशी राहील?

**पेंद्या.**—आहे, खलें मी तिला ओललतानां आत्तां आईकलें.

**नारद.**—अरे, तंबुऱ्याची तार वाजते ती. तूं फार शहाणा म्हणून म्हैस ओरडल्या प्रमाणें ऐकूं येतें समजलास! आईक. (तंबुरी वाजवून दाखवितो.)

**पेंद्या.**—अले वाले वा! तांगलें वात्तें हें! बलें कद्देदलालबुवा, कुते तालेत बलें?

नारद.–सांगतों, पण तूं आपला गडी आहेस ना?

पेंद्या.—होय (मान हालवितो.)

नारद.—या वाटेनें कृष्ण गेला का? मला सांग बरें.

पेंद्या.—गेला.

नारद.—कोणीकडे जातों ह्मणाला?

पेंद्या.—आदी ह्मनाला लुकमिनीकले, मग बोलला थत्यभामेकले, मग थांगू लागला आईला निलोप थांगाला दातों.

नारद.–(अंतर्ज्ञानानें जाणून.) तुला मौज पहाण्याची आहे का?

पेंद्या.–होय. कुते आहे!

नारद.–आपण दोघे सत्यभामेच्या मंदिरांत जाऊं. मग मी तिला कांहीं सांगितल्यावर होईल ती दिसेल.

पेंद्या--तला तलमग. (दोघे निघून जातात व पडदा पडतो.)

---

# प्रवेश ३ रा.

स्थळ–द्वारका, रुक्मिणीचें मंदीर.

## पात्रें.

रुक्मिणी, दासी, कृष्ण.

(दासीसहवर्तमान रुक्मिणी प्रवेश करते.)

रुक्मिणी.–दासी, किती रात्र झाली बरें!

दासी.–अजून कांहीं सहा घटका वाजल्या नाहींत.

**रुक्मिणी.**—आज पलंगावर कसल्या पुष्पाची शय्या केली आहेस?

**दासी.**—अतांशे मोगऱ्याचा बार आहे. माळ्यानें तींच आणून दिलीं होतीं.

**रुक्मिणी.**—पंचारती, उपहाराचें, ऊष्णोदक अशी सगळी तयारी केली आहेस का?

**दासी.**—होय. सगळी तयारी करून ठेवली आहे.

**रुक्मिणी.**—तुला जर नीज येत असली तर जाऊन नीज. (दासी जाते, व कृष्ण प्रवेश करतो. त्यास पाहातांच हास्यवदन करून लज्जायुक्त, नमस्कारपूर्वक पंचारती ओंवाळून मंचकावर बसविते व आपण दूर उभी राहते).

**कृष्ण.**—प्रिये, आज कां बरें दूर उभी राहिलीस? अग, दिवसास नानाप्रकारचे उपद्व्याप करून श्रम होतात त्यांचा परिहार व्हावा व सर्व रात्र आनंदांत जावी अशा हेतूनें परमेश्वरानें स्त्री हें एक रत्न निर्माण केलें. चंद्रदर्शनानें जशी औषधींस टवटवी येते तशीच स्त्रीचा मुखेंदू पाहून पुरुषास टवटवी येते. चंद्रापासून अमृत मिळाल्यानें त्यांस जसा आनंद होतो व त्या प्रफुल्लित होतात; तद्वतच स्त्रीच्या अधरामृतपानानें पुरुषाची व्यवस्था होते. तर, हे शृंगार सरोवर मराळे, पिकस्वनें, एक वेळ या कृष्णाला आलिंगन देऊन हा तप्त झालेला देह अधरामृतानें शांत कर. (असें ह्मणून उठतो व तिला आलिंगन देऊन वामांकावर घेतो आणि चुंबन

करून ) सखे, आज तुला कसला राग आला ह्मणून लांब उभी राहिलीस बरें ?

रुक्मिणी.–राग कसला यायचा आहे! आपण सांगितलात तोच प्रकार उलट आहे. वली जशा चंद्रदर्शनानें प्रफुल्लित होतात तशाच आह्मी स्त्रिया पतिदर्शनाची इच्छा करीत असतां पतिरूपी पूर्ण चंद्रास पहातांच आह्मांस आनंद होतो. परंतु माझे दैवीं तो आनंद फारच अल्प आहे ह्मणून खेद वाटतो. (किंचित डोळे पुसल्यासारखें करून गळ्याला मिठी मारते.) प्राणनाथ, आज इतका विलंब कां लागला बरें!

कृष्ण.–(आनंदानें तिच्या तोंडावरून हात फिरवून) काय प्रेम हें! अर्ध घटका ज्यास्ती वेळ लागला तों डोळ्यांतून पाणी सुद्धां आलें! (तिचे डोळे पुसतो) सकुमारे, काय हें! अग, माझा लहानपणाचा सोबती पेंद्या तुझ्या ओळखीचाच आहे. तो मार्गांत भेटला तेथें त्याणें एक घटकाभर आडविलें, नंतर मोठ्या घाईनें आईकडे गेलों व थोडासा जेऊन इकडे आलों. तूंच सांग, मला दुसरीकडे निद्रा तरीं येईल काय! तुला अनुभव आहेच.

रुक्मिणी.—होय. पण एकादी चंद्रानना जर मार्गांत भेटली तर ती कुठें सोडणार आहे. थोड्याका आहेत! माझ्याशिवाय सातजणी वाटच पहात असतात.

**कृष्ण.**–(गळ्यावर हात ठेऊन) तुझ्याच गळ्याची शपथ मी दुसरीकडे गेलों असेन तर.

**रुक्मिणी.**–इतकी कांहीं शपत नको व्हायाला. बरं, आतां तांबूल किंवा उपहार?

**कृष्ण.**–आज कांहीं इच्छा नाहीं तांबूलच दे.

**रुक्मिणी.**– माझी इच्छा आहे पण, एक घोटभर ऊन दूध आणि थोडी शर्करा कांहीं ज्यास्ती होणार नाहीं.

**कृष्ण.**–जशी तुझी इच्छा. (रुक्मिणी पात्र सिद्ध करते, उभयतां उपहार करून मंचकावर बसतात. तांबूल भक्षणा नंतर)

**रुक्मिणी.**–प्राणनाथ, आपण मंदिरांत आल्यापासून मी आपणांस कांहीं विचारणार आहें. राग न येईल तर विचारतें.

**कृष्ण.**–चारुगात्रे, तुझ्या गोड शब्दांचा मला कधीं तरी राग आला होता का?

**रुक्मिणी.**–न जाणो, वेळेचा नेम नाहीं. आतां विचारयें. आपल्याजवळ सुगंधिक वस्तू काय आहे? जो गंध मला ओळखतां तर येत नाहींच व मंदिरांतील सर्व सुगंध ज्या वासापुढं तुच्छ वाटतात.

**कृष्ण.**–(पुष्प दाखवितो.) हें पहा, नारदस्वामींनीं स्वर्गलोकांतून माझ्याच करितां मुद्दाम आणलें. या पुष्पाला कोमलपणा किती आहे पाहिलास?

**रुक्मिणी.**–प्रियकरा, या पुष्पाचँ नांव काय बरँ!

**कृष्ण.**—हें पारिजातकाचें पुष्प, याचा वृक्ष पृथ्वींत नाहीं. इंद्राच्या नंदन वनांत आहे.

**रुक्मिणी.**—प्राणेश्वरा, हें आपल्या हातांत असल्यापेक्षां माझ्या वेणींत फारच शोभा देईल असें मला वाटतें.

**कृष्ण.**—तुझ्या वेणींत तें कोमेजून जाईल, चुरमडेल, मग त्याचा फारवेळ उपभोग घेतां येणार नाहीं.

**रुक्मिणी.**—वेणीचा उपभोग जपून घेतला ह्मणजे पुष्पाला धास्ती नाहीं.

**कृष्ण.**—बरें तर. (असें ह्मणून तिच्या वेणींत तें फुल गुंफतो व दोघेंहि आनंदानें निद्रिस्त होतांच पडदा पडतो.)

---

# प्रवेश ४ था.

स्थळ—द्वारका. सत्यभामेचें मंदीर.

## पात्रें.

सत्यभामा, दासी, सेवक, पेंद्या, नारद, रुक्मिणी.

(मंदिरा बाहेर एक सेवक पहारा करीत आहे, तों नारद व पेंद्या येतात.)

**नारद.**— (सेवकास) कोणरे तूं!

**सेवक.**— (नमून) महाराज, मै आपका बंदा गुलाबसिंग. क्या हुकूम है!

**नारद.**—सत्यभामेला जाऊन सांगकीं, नारद प्राप्त झाला आहे.

**सेवक.**–महाराज, अबी अंदर जानेका हुकूम नहीं. फजर आवोगे, तो बाईसाबकी मुलाकत होगी और आपकूं दच्छनाबी मिलेगी.

**नारद.**–अरे मी दक्षणा मागण्याकरितां आलों नाहीं. सत्यभामेला भेटून तिला कांहीं निरोप कळवावयाचा आहे. तूं जाऊन कळीव, अथवा मला तरी आंत सोड.

**सेवक.**–महाराज, अबीजाव. सुप्रभात हम् बाईसाबकूं कहें गे.

**नारद.**–अरे सेवका, माझ्याकरितां जरी तूं सत्यभामेला जागी केलीस, अथवा तिच्या हुकमा शिवाय जरी मला आंत सोडलेस तरी ती तुजवर रागें भरणार नाहीं.

**सेवक.**–पंडत महाराज, खाली तकार क्यं करते हो! एक बखत कह दिया अबी जाव. हम नहीं छोडते, और इस्बखत हम्बी अंदर नही जाते. सबेरे जो तुमारेसें होयगा सो कर लेव लेकिन अबी अंदर जानेकी बात मत करो.

**नारद.**–(पेंद्यास) पेंद्या, हा सेवक मोठा कुरेबाज दिसतोरे!

**पेंद्या.**–होय. लतकीता "थोलनेके नई" ह्मनतो. पन त्याला अतें थांग कीं, आमी आंत गेल्याथिवाय थोलनाल नाई.

**नारद.**–सेवका मला तर फारच गडबडीचें काम आहे. मी आलों असतां सेवकानें सोडलें नाहीं, असें जर उद्यां सत्यभामेला कळलें तर फार वाईट गोष्ट होईल. मला बऱ्या गोष्टीनें आंत सोड; तूं नसोडलेंस तरी गेल्याशिवाय राहणार नाहीं. (पुढें जातो.)

सेवक.—(त्यास आडवून) अबे पीछे हट. ऐसें फंद कायकू करताहै?

नारद.—(पेंद्यास) पेंद्या, हा खरेंच सोडीत नाहीं. अगदीं एकेरीवर आला.

पेंद्या.—तूं तिकलून आपल्या चिपल्या आंत ताक. अनि मी इकलून आपली घोंगली आंत फेंकतों मग आनायाला दातों ह्मनून दावें.

नारद.—(हातांतील चिपळ्या आंत टाकून.) अरे माझ्या चिपळ्या.

सेवक.—(त्यास आडवा येऊन.) हट पीछे. यहांसे निकाल जा (चिपळ्या बाहेर उडवितो.)

पेंद्या.—(घोंगडी आंत टाकून.) अले माजी घोंगली आंत आए ती आनतो. (आंत जाऊं लागतो.)

सेवक.—(त्यास धक्का देऊन) अबे गव्हार, पीछे हट नही तो मार खायगा.

नारद.—पेंद्या, हा कांहीं आपणांस खचीतच सोडीत नाहीं. तर आपण ती गोष्ट सत्यभामेला मंदिरा बाहेरूनच मोठ्यानें ओरडून कळवूं.

पेंद्या.—बलें तल. (असें ह्मणून मंदिराच्या बाहेर जातात. व उंच स्वरानें नारद.)

नारद.—सत्यभामे, निद्रिस्त काय झाली आहेस? जागी हो. अग मी नारद, तुला कांहीं वर्तमान कळवावें ह्मणून आलों

निघतां पद्मा तशी आज मी ॥ दासी
सेवक संपत्ती कामि नहो येती सदां श्री-
हरी ॥ दुर्दैवी वदता कसे मज गमें आ-
श्चर्य हें अंतरीं ॥ १ ॥

नारद.–सत्यभामे, अद्याप तूं भ्रमांत आहेस.

## श्लोक.

(शार्दूल विक्रीडित.)

वस्तू दुर्मिळ भूवरी नच मिळे ती आणुनी
आज मी ॥ कृष्णातें दिधली स्वयें पर घरीं
गेली मला न क्षमी ॥ वाटे अंतरिं खेद
फार तुजला सांगावया मंदिरीं ॥ आलों तों
निजलीस भृत्यहि तुझा सोडी नगे लौकरी॥१॥

तेव्हां.—

## आर्या.

दीर्घ स्वरें करूनी, लागाया दाद फार ओरडलों॥
तैं तुज कळलें नातरिं, होतों गे संकटामधें पडलों १

**सत्यभामा.**–अशी कोणती वस्तू आपण आणली होती बरें ?

**नारद.**–भामे तुला काय सांगू !

## श्लोक.

(शार्दूल विक्रीडित.)

संपत्ती उदधींत गेलि ह्मणुनी देवा सुरांनीं
कृतीं ॥ सिंधूतें मथिला तदा निघति गे रत्नें
दहा च्यार तीं ॥ माजीं गंध तरू असे नि-
पजला जो पारिजाताख्य तो ॥ शक्रें नंदन
काननीं वसविला राखी तया फार तो ॥ १ ॥
पुष्पें मंडित जाहला ह्मणुनियां पूजी मला
त्या फुलें ॥ तें या मंदिरि शोभिवंत ह्मणुनी
कृष्णास मी अर्पिलें ॥ झाली नष्टच ती
मदीय मनिषा तें पुष्प भैमीकडे ॥ गेलें
सांग हरी भजे तुजसिकीं अन्येस हें रोकडें ॥२॥

**सत्यभामा.**–(आयकून किंचित दु:खानें.) नारदस्वामी, आपण जी गोष्ट सांगितली, त्यावरून पाहिलें तर माझा अपमान झाल्यासारखें झालें खरेंच. कृष्णप्रीति मजवर नसल्या कारणानें मी दुर्दैवीही खरीच. आतां याला काय उपाय करावा? (बोटें मोडून) या सवती केव्हां नाहींशा होतील असें झालें आहे. नारदस्वामी, या गोष्टीच्या निराकरणार्थ कांहीं

उपाय सांगा. ही गोष्ट आतां मला सहन होत नाहीं.

नारद.–मी तरी यांत काय सांगूं ? आतां मला असें वाटतें–

## आर्या.

अपमानापेक्षां जरि, आला मृत्यू तरी सुख-
प्रदच ॥ सकलांतेंही वाटे, नाहिं दुजा
मानभंग सम जाच ॥ १ ॥

सत्यभामा.–नारदस्वामी, आपण खरें बोललेत. आतां मी प्राणत्याग करावा हेंच योग्य नं?

नारद.–तुला जसें वाटेल तसें तू कर. आतां मी जातों. (उठतो) पेंद्या, चल आतां.

पेंद्या.–तला आतां, खूप मोद केलीत.

सत्यभामा.–नारदस्वामी, नमस्कार करते. कृपा असावी. आतां, एवढा अपमान सहन करून ही सत्यभामा जिवंत राहील असा अर्थ नाहीं.

नारद.–सुखी रहा आणि आनंद कर; मी जातों. (नारद व पेंद्या निघून जातात.)

सत्यभामा.– (दु:खी होऊन.)

## श्लोक.—(भुजंगप्रयात).

प्रियप्रीतिला पात्र जी नाहीं नारी ॥ तिचा जन्म

वायां तिला दुःख भारी ॥ अशीनें जगीं काय ठेवोनि काय ॥ मरावेंच हा योग्य तीतें उपाय ॥१॥

देवा, असा मी तुझा काय अपराध केला होता बरँ! कीं ज्याचें शासनरूपीं कृष्णप्रीतींत अंतर आणलँस.

**श्लोक.**—(भुजंगप्रयात.)

कुदैवा तुवां साधिला पूर्ण दावा ॥ आतां
नाहिरे या जिवाला विसावा ॥ जळो दे-
ह हा केविं जन्मास आल्यें ॥ पति प्रीति
सौख्यें कधीं नाहि धाल्यें ॥ १ ॥

आजपर्यंत मी मनांत असें समजत होत्यें कीं, माझ्यासारखी सुखी, भाग्यवान अशी नायको जगांत सांपडणार नाहीं. परंतु त्या गर्वाचा एकाएकीं लय झाला आतां काय करूं? ईश्वरा!

**श्लोक.**—(मालिनी).

हरहर विधी कैसें भाळिं या लीहिलेंस ॥ कु-
कट अवल देहा कायरे निर्मिलेंस ॥ कुठवर
अशि दुःखें सोसुनी वांचु आतां ॥ झडकर
मजलागीं नेइना कां निहंता ॥ १ ॥

कृष्णा, आजपर्यंत या सत्यभामेबरोबर, नानाप्रकारचे विलासोपभोगादि करून; " तुझ्याशिवाय मला कोणीही प्रिय नाहीं " असें सांगत होतास, तें सर्व कां विसरलास ? अरे, जर मी कांहीं तुझा अपराध केला असें तुला वाटलें होतें, तर तूं आपल्या हातांनीं मला शासन करावयाचें होतेंस. देवा, सवतीला धन्य करून मला अक्षय दुःखसमुद्रांत लोटतांना तुला मुळींच दया आली नाहीं काय? कृष्णा, ही सत्यभामा तुझी पट्टराणी असा अभिमान वहात होती; तो गर्व आज फुकट गेलानें ? ( कांहीं थांबून) तूं तरी काय करशील ? स्त्रियांना रडत बसविण्याची तुझी जन्मखोड जर तुला सुटतच नसली तर तुझा उपाय काय? अरे, आजपर्यंत तूं कोणत्या स्त्रियेस अखंड सुखांत ठेवलें आहेस बरें! शतावधि स्त्रियांची माझ्यासारखीच अवस्था केलीस.

**श्लोक.**—(शार्दूलविक्रीडित.

**गोपी बाळपणींच मोहुन तयां दुःखांतरीं लोटिलें॥ राधा आवडती तिला न सुख तें कुब्जेप्रती लाधलें ॥ कापटचें अवला वहू फसविल्या हें जाणुनीयां मनीं ॥ ज्यापेक्षां वरिलें तरी सुख मला होईल कैसें जनीं ॥ १ ॥**

**दासी.**—आईसाहेब, आतां आपण दुःख करूं नये. कृष्णनाथ

आल्याच्या आधीं जरी आपण कंठशोष करून घेतला तरी काय उपयोग होणार?

**सत्यभामा.**—दासी, कशाला माझें शांतवन करयेस? तो कृष्ण आतां इकडे येणार नाहीं. अग तो फारच निष्ठुर आहे; तुला काय सांगू ?

## श्लोक.—(शार्दूलविक्रिडित).

प्रीती दावि वरी परी कठिणगे काळा असे अंतरीं॥ बारा गांव गिळोनि अग्नि सहजें टाकी क्षणाभीतरीं ॥ मोठा नाटकि चोर जार हरिसी तूं जाणसी ना सये ॥ मृत्यूवाचुनि मार्ग नाहि दुसरा आतां मला निश्चयें ॥ १ ॥

**दासी.**—बाईसाहेब, आपण ह्मणतां; पण मला असें वाटतें कीं, कृष्णनाथ मंदिरांत आल्याशिवाय राहणार नाहींत. आपण एक क्षणाकरितां कांहीं अविचार करूं नये.

**सत्यभामा.**—(अतिशय शोकानें) नाहींग नाहीं! हा तुझा व्यर्थ भ्रम आहे. आतां जर मी वांचल्यें तर उद्यां सर्व बायकांत मला नकट्या नाकानें वागावें लागेल. ती सवत मोठ्या तोऱ्यानें तें पुष्प वेणींत गुंफून माझ्यापुढें येईल, तें मला सहन होणार नाहीं. ईश्वरा! आतां एकदां मरण देऊन सर्व दुः-

त्याचा लय करशील तरच ठीक आहे. नाहीं तर माझ्यासारखी हतभाग्य स्त्री कोणीच नाहीं. ( व्याकूळ होते.) दासी, आतां त्वचितच मी प्राणत्याग करणार. मात्र तुला सांगत्यें असँ कर.

**श्लोक.**—(शार्दूलविक्रीडित).

माझें प्रेत न नेववी सवतिच्या दारावरोनी तसा ॥ हस्तस्पर्श तिचा नहो जप अशी अंतीं तुला जा-चसा ॥ मत्संगें घडंतो परीं करि क्षमा भामा मनीं आठवीं ॥ दास्यत्वांतुन मुक्त हो मज अतां शोका-ग्नि हा आटवी ॥ १ ॥

( असें सांगून मोह पावत्ये; इतक्यांत रुक्मिणी प्रवेश करत्ये.)

रुक्मिणी.— **श्लोक.**—(शार्दूलविक्रीडित).

नाथाच्या सुदयें अमोलिक जगीं जी वस्तु ती लाधल्यें ॥ वेणी पुष्पयुता अशी सवतिशीं दावाव-या चालल्यें ॥ तोरा सर्व तिचा हरेल बघतां या भैमिला लोचनीं ॥ दुःखाश्रूप्रति काढुनी करिल ती शोकास आता झणी ॥ १ ॥

(कांहीं पुढें जाऊन) कोण आहेग मंदिरांत ? दासी.

**दासी.**—जी बाईसाहेब, ही मी आहें. काय आज्ञा?

**रुक्मिणी.**—अग, सत्यभामाबाई कुठें आहेत? (सत्यभामेस अस्ताव्यस्त पडलेली पाहून)—

## श्लोक.—(भुजंगप्रयात.)

कचा सोडुनी मोकळे व्यस्त देहीं॥ पिशाच्चापरी लोळते आज कां ही॥ अगे ओढुनी टाक जा या भुतास॥ जळो ही तनू भीतिदाची जनांस॥ १॥

**सत्यभामा.**—(उठून क्रोधानें) सवती, कशालाग माझ्या मंदिरांत आलीस? मोठ्या तोऱ्यानें "हिला ओढून टाक, हिची भय दाखविणारी तनू जळूंदे" अशी भाषणें करून जी अपरात्रीं येऊन दासीला धमकी देतेस याचें कारण काय? तुझें तोंड इतकें कां माजलें आहे? कांहीं तरी विचार करून बोल.

**रुक्मिणी.**—अग, मी कांहीं खोटें नाहीं बोलल्यें. खरीच पिशाच्चासारखी, मोकळे केस टाकून, अलंकारांचा त्याग करून, मंचकाशिवाय भुईवरच लोळत आहेस म्हणून म्हटलें. यांत तुला राग कसला आला? माझें तोंड कांहीं उगीच माजलें नाहीं तुझ्यासारखें. केवढा हा तुझा झणकारा! अशा स्वभावानें दासी तरी कशा टिकत असतील कोण जाणे.

**सत्यभामा.**—सवती, माझें उणें काढून, तुझा कलह माजविण्याचा मनोदय दिसतो; याकरितां तुला आधीं सांगत्यें कीं,

तूं आपली वन्या नेलानँ आपल्या मंदिरांत चालती हो. तुझ्या ह्या निंद्य भाषणांनीं मला राग आल्याशिवाय राहणार नाहीं. या सत्यभामेचा राग फार वाईट आहे असँ तुला प्रसंगीं अनुभवास येईल.

**रुक्मिणी.**—अगबाई ! कायहो सत्यभामा बाईसाहेबांचा राग हा? अग सवती असत्यभामे, तुला लाज वाटत नाहीं काय ?

## श्लोक.—(शार्दूलविक्रीडित.)

लक्ष्मी नाम सदांहि काननिं फिरे वेंचावया गोवऱ्या ॥ नांवाचा धनपाळ हातिं करटी खाया न त्यातें वऱ्या ॥ तैसें नाम तुझेंहि रम्य परि ती कर्तव्यता ना तशी ॥ सत्याचा लवलेश नाहीं तुजसी तूं सत्यभामा कशी ॥ १ ॥

उगीच सत्यभामा, सत्यभामा, असँ कशाला मिरवतेस? तुला वाटलँ असेल कीं, मी कृष्णाची पट्टराणी आहें, हवँ तसँ बोललें तरीं चालेल; पण माझ्याजवळ नाहीं हो चालणार.

**सत्यभामा.**—मी कांहीं तुझ्या वरीं बोलायला आल्यें नाहीं. कृष्णाची मी पट्टराणी व प्रीति माझ्यावर आहे, असँ सुद्धां तुला मी कधीं सांगितलँ नाहीं. आणि मुळींच नसली तरी मला त्याची काळजी नाही. मात्र—

**श्लोक.**—(शार्दूलविक्रीडित.)

कृष्णप्रीति जरी असे तुजवरी तूं बैस त्याचे शिरीं ॥
गे कां तूं छळितेस येउनि निशी एकांति माझें घरीं॥
सत्याचा लवलेश काय तुजला नीचे दुजा दा-
खवूं ॥ सत्यानें हरि अर्ध अंगिं वसल्ये केवीं तुला
मी भिऊं ॥ १ ॥

**रुक्मिणी.**—आहाहाहा ! सूर्य आणि चंद्र तुझ्याच सत्यपणानं उदय अस्त पावतात, असँच तुला वाटलँ असेल; असँ दिसतं. अग सवती निलाजऱ्ये,

**दिंड्या.**

मुळीं खोटें गे, तुझें पितृकूळ ॥ तुझ्या बापानें, हरी-
वरी आळ ॥ घातला परि तो, सत्य नहो जेव्हां ॥
समजुतीस्तव हें रत्न दिलें तेव्हां ॥ १ ॥ तुझ्या
माहेरीं, मुळीं लटाकि बोली ॥ तुला कैशी सत्यता
सोधुं आली ॥ व्यर्थ कष्टसि कां, धरुन गर्व थोर ॥
मत्छरातें त्यज, करीं मनिं विचार ॥ २ ॥

**सत्यभामा.**—अग रुक्मिणी, दुष्टे दुसऱ्याची चौकशी करण्याचे आधीं आपला नीट विचार करावा. तुला स्मरत नाहीं काय ?

## श्लोक.—(इंद्रवज्रा.)

पेटे तुझ्याग मनिं काम जेव्हां ॥ विप्रा करीं पत्र ह-
रीस तेव्हां ॥ धाडोनियां पाठिस लागलीस ॥
जाणेंच मी सर्व तुझ्या कृतीस ॥ १ ॥

## दिंडी.

देत होता तुज, बंधु शुशूपाळा ॥ परीं तुझिया मनिं,
थोर विषय चाळा ॥ अवदसे त्वां प्रिय, बंधु विटं-
बीला ॥ कीर्ति सारी तुझि, गम्य गे जगाला ॥

रुक्मिणी.—अग सत्यभामे, मी जरी कृष्णाला पत्र पाठवून, त्याचे पाठीस लागल्यें; तरी ज्या कुळांत उत्पन्न झाल्यें, त्या क्षत्रिय कुलधर्मानुरूप इच्छित पती वरला. कृष्णाच्या मनापासून, मला वरावें असें होतें, ह्मणून तोहि माझ्यासाठीं एकटाच धांवत आला. पण, नको नको ह्मणत असतां एकाद्या माणसाच्या अंगाला जशी खरूज जडत्ये, तशी तूं कृष्णनाथांच्या अंगाला जडली आहेस. एकेदिवशीं प्राणनाथ तुझ्याबद्दल, माझेजवळ असें बोलत होते कीं,

## श्लोक.—शार्दूलविक्रीडित.

गंधी येत मुखास दंत अवघे गेले लया थेरडी ॥

कंटाळा उपज विलोकुनि तिला बोले सदांही रडी ॥ चाले वांकडि बोबडी अवदसा केसांत झाल्या उवा ॥ आतां मी नच जाय मंदिरिं तिच्या ती नावडे या जिवा ॥ १ ॥

समजलीसनँ! तुझ्या हितासाठीं मुद्दाम या अपरात्रीं तुला सांगण्याकरितां आल्यें, कीं इत:पर कृष्ण तुझ्या घरीं तर येणार नाहींच. दैवयोगानँ आला, तर लांब उभी राहून, फार नम्रतेनँ बोलत जा. लाडालाडानँ, जवळ जाऊन उद्धटासारखी बोलल्लीस; तर दर्शन सुद्धां दुर्लभ होईल. बाई, अशा भांडणांत काय अर्थ आहे? आपली रितीनँ वागत जा ह्मणजे झालँ.

**सत्यभामा.**–अगबाई, मी जरी वृद्ध झाल्यें, मुखाला दुर्गंधी आली, बोबडी बोलूं लागल्यें, वांकडी झाल्यें तरी चिंता नाहीं. कृष्ण माझ्याकडे न आला तरी चालेल. कारण "जी वृद्ध झाली, ती सर्वस्वीं धाली" अशी एक ह्मण आहे, तशी माझी गत. आतां तूं मात्र तरूण आहेस, या साठीं—

**श्लोक.**—(शार्दूलविक्रीडित.)

थाटानें नगयुक्त अंग करूनी शृंगारयुक्ता-कृती ॥ साऱ्या आचर बोल कोकिल परी चाले गजाची गती ॥ मोही मानस वीट

ठेविं सदनीं येई मना जो विट ॥ कामाचा उपभोग घेई पुरता कीर्ती करी चोखट ॥१॥

रुक्मिणी.—अग वेडे, ज्यानें अचाट कृत्य करून, राधेसारख्या कामोत्कट स्त्रियांस चटपट लावली; धीट होऊन लक्षावधि गोपींचा बिकट कंदर्प सुभट्टपणानें पळविला; एका घटकेंत कोट कोट वीरांस भवतटा पार केलें; त्या विटाला मी मनापासून हृदयांत:करणांतच जागा दिली आहे. दुष्टे, तूं मात्र आपला परिणाम नीट होय असा विचार कर.

श्लोक.—(इंद्रवज्रा)

माळा करीं घे करि नामघोष ॥ वाती करी पुजि उमा महेश ॥ पाणीं सदां घालुन तूळशीस ॥ मागे दुज्या जन्मिं पतीसुखास ॥ १ ॥

सत्यभामा.—अग सवती, जळो ही तुझी जिव्हा, किडे पडोत. माझ्या घरांतून चालती हो. (हातानें तिला ढकलते.)

रुक्मिणी.—तुला हें घर कोणी दिलें? उगीच कशाला मिरवतेस? बैस एकीकडे एखाद्या बटकुरीसारखी. वाहवाग! बोलतां बोलतां हातां पिटीवर सुद्धा आलीस; अग सवती, विचार करून बोलत जा व तशीच वागतही जा. तुला अज्ञान लोक मात्र माणूस ह्मणतात.

**सत्यभामा.**—(अतिशय क्रोध व शोकाच्या आवेशानें.) सवती, चांडाळणी, माझ्या समोरून चालती हो. नाहीं तर मी आतां तुझ्यापुढें प्राणत्याग करून हत्येसारखी लागेन.

**रुक्मिणी.**—प्राण दिलास, तर प्रपंचापासून तरी सुटशील आणि मलाही एक सवत नाहींशी होईल सुखानें मर.

**सत्यभामा.**—हर हर परमेश्वरा ! ! ! (असें दीर्घस्वरानें ह्मणून मोह पावते.)

**रुक्मिणी.**—(दासीस) अग दासी, ही आतां कुठें आड विहीर करील; जप हो नीट. (निघून जाते.)

**दासी.**—(आपल्याशींच) आपण हें वर्तमान, कोणत्याही रितीनें कृष्णनाथास कळवावें; ह्मणजे सर्व नीट होईल. (असें ह्मणून निघून जाते व पडदा पडतो.)

---

# प्रवेश ५ वा.

### स्थळ—रुक्मिणीचें मंदीर.

## पात्रें.

रुक्मिणी, दासी, कृष्ण व सत्यभामेची दुसरी एक दासी.

(मंचकावर कृष्ण एकटाच निद्रिस्थ असतां पडदा उघडतो.)

**रुक्मिणी**—(प्रवेश करून) कोण आहेग ! दासी.

**दासी.**—(प्रवेश करून घाबरेपणानें) जी बाईसाहेब. (हात जोडते).

**रुक्मिणी.**—(हळूच) मी गेल्यावर प्राणनाथ जागे झाले होते का?

दासी.—नाहीं. (रुक्मिणी जाऊन मंचकावर कृष्णाच्या संन्निध बसतांच कृष्ण जागृत होतो.)

कृष्ण.—(आळस देऊन व डोळे पुसून) प्रिये, कोणीकडे गेली होतीस बरें? मी निद्रेंत असतां तुझ्या अंगावर ह्मणून हात टाकला तो शय्येवरच पडला, तेव्हां जागा होऊन पाहूं लागलों तों तूं नाहीस. तेव्हांपासून कांहीं गाढ झोंप आली नाही. कोणीकडे गेली होतीस बरें ?

रुक्मिणी.—प्रियकरा, आंवशीस आपल्याला लौकर झोंप लागली. मग काय? कोणी बोलायालाही नाही; चैन पडेना, ऊष्मा होऊं लागला, ह्मणून मागल्या पुष्पकरंडकोद्यानांत गेलें होतें. फार वेळ झाला नाही कांहीं.

(इतक्यांत सत्यभामेची दासी खूण करून निघून जाते.)

कृष्ण.—(खूण पाहून) असो. प्रिये, एकवेळ चुंबन दे. मलाही आतां चैन पडत नाहीं, ह्मणून मी याच वेळेस शृंगारवनांत जातों.

रुक्मिणी.—मी बरोबर येतें.

कृष्ण.—नको. अतां मी एकटाच जातो. तूं नीज. (चुंबन घेऊन निघून जातो व नंतर पडदा पडतो.)

# प्रवेश ६ वा.

स्थल—सत्यभामेचें मंदीर.

## पात्रें.

कृष्ण, सत्यभामा, दासी.

( सत्यभामा मूर्च्छित आहे, व दासी तिला वारा घालित आहे, इतक्यांत पडदा उघडतो व कृष्ण प्रवेश करून.)

कृष्ण.—दासी, माझी सत्यभामा कोठें आहे ?

दासी.—(हातानें दाखवून) ह्या आहेत. कपाळ दुखतँ आहे; पहा आपण.

कृष्ण.—(सत्यभामेजवळ जाऊन व तिला पाहून.)

### श्लोक.—(उपेंद्रवज्रा.)

सदां सुगंधी तव केशशोभा ॥ बघोनि हो तोषच्च पद्मनाभा ॥ तशी तनूही मृदु आज व्यस्त ॥ प्रिये तुवां टाकिलि कां समस्त ॥ १ ॥

( अलंकार सावरतो, व तोंडावरून हात फिरवून ).

### श्लोक.—(इंद्रवज्रा).

नेत्रीं वहाती जलपूर कां हे ॥ प्रेमार्द्र होऊन हरीस पाहे ॥ वारीन दुःखाप्रति बोल कांहीं ॥

विश्रांति आह्मां तुजवीण नाहीं ॥ १ ॥

(तिचें शीर मांडीवर घेऊन व हनवटीस हात लाऊन) प्राणसखे, कांबरें बोलत नाहींस! आज इकडे येण्याला किंचित् उशीर लागला, ह्मणून दुःख झालें असें वाटतें. ऊठ, असें काय वेड्या- सारखें करतेस! मी कांहीं दुसरीकडे गेलों नाहीं. एका भक्ताला संकटांतून तारण्याकरितां गेलों होतों ह्मणून अपरात्र झाली.

**सत्यभामा.**–(दुःख व क्रोधाच्या आवेशांत चट्कन उभी राहून).

## श्लोक.–पृथ्वी.

अरे कपट घातका न वद जा दुज्या मंदिरीं ॥
मला समजली तुझी कृति वसे मनी जी सुरी ॥
सुता भिमक घे शिरीं मिरव भूवरी जाउनी ॥
त्यजीन जिव मी तुझ्यावरि नको मला जाचणी १॥

**कृष्ण.**–(तिच्याजवळ जाऊन) सत्यभामे, तुला वेड तर नाहींनां लागलें! तिच्याक‍ जाणें सोडून तर मला कित्येक वर्षें झालीं. आतांशे तर तिचा मला इतका वीट आला आहे कीं, तिचें नांव ऐकतांच किळस येतो व स्नान करावेंसें वाटतें. असें असून तुझ्या मनांत हा संशय गेला. कसा चमत्कार आहे!

श्लोक.—(पृथ्वी).

त्यजून दुसऱ्या स्त्रिया तव गुणावरी लुब्धलों ॥
प्रिये मधुर बोलगे अधर चुंबना शोषलों ॥ धरून
मनिं रोष कां फुकट कष्टसी वैस ये ॥ ममांकि
मन सोडुनी करि विनोद केली स्वयें ॥ १ ॥

**सत्यभामा.**– (झिटकारून) असलीं चावटपणाचीं बोलणीं माझ्याजवळ नकोत.

श्लोक.—(शालिनी.)

ह्मातारी जी जाहली गंधि भारी ॥ येतो तोंडा
बोबडी जी कुनारी ॥ ती ही सोडी सेवि जा रूप-
वान ॥ शृंगाराचा थाट जीचा उणा न ॥ १ ॥

**कृष्ण.**–(जवळ जाऊन व खांद्यावर हात टेकून) आतां मात्र शर्थ झाली. प्राणसखे, अग तुला असें कोण ह्मणेल ?

श्लोक.—(इंद्रवज्रा).

हा तो मुखेंदू कमला समान ॥ मी भृंग रुंजी करि
रात्रदीन ॥ याच्या मधुनें मन वेधलें गे ॥ कांहीं
न यावांचुन गोड लागे ॥ १ ॥ (चुंबन घेतो).

**सत्यभामा.**–(रागानें) किती लोचटपणा हा! नको नको ह्मणत असतां जवळ येऊन निर्लज्ज कृती करणें याचें नांव तरी काय!

**कृष्ण.**–(पुन: जवळ जाऊन) प्राणसखे, असे रागानें दु:खोद्गारयुक्त भाषण करतेस, त्यायोगानें तुला श्रम होतात. आणि तुझें नाक, डोळे, गाल, हे लाल झालेले व त्यांवर दु:खाश्रूंच्या धारा चाललेल्या पाहून तर माझ्या हृदयांत वज्राप्रमाणें टोंचतें. अग, काया, वाचा, मनें करून ज्या ठिकाणीं माझी प्रीति जडली व तिचा तुलाही अनुभव, असें असतां मी अन्य सदनीं गेलों असें तुला वाटलें याचें मला मोठें आश्चर्य वाटतें. कोमलांगि, नको दु:ख करूं. (असें बोलून तिला दृढालिंगनासह उचलून मंचकावर नेतो) तुला इतका राग येण्यासारखा त्रास कोणी दिला बरें? खरेंच सांग. मी शासन केल्याशिवाय कदापि राहणार नाहीं.

**सत्यभामा.**–(गळ्याला मिठी मारून व स्फुंदस्फुंदून) प्राणनाथ, त्या दुष्ट सवतीनें मला गांजलें हो गांजलें! काय करूं! आपण आलेत ह्मणूनच प्राण राहिले. नाहीं तर मी विष भक्षण करणार होतें.

**कृष्ण.**–कोण, ती भैमी इकडे आली होती? आणि तिणें तुला असा त्रास दिला अं! (राग आल्यासारखें करून) या वेळेस जर ती समोर असती, तर फर्माशीचा मार दिला असता. नाहीं ह्मणूनच सुटली.

**सत्यभामा.**– (सस्मित) आहाहा ! जसं कोणी ह्मणेल खरंच हें. अरे कृष्णा, कशाला हें बोललास? तुझी ही वरवर माया दाखवून प्राण हरण करण्याची विद्या मला सगळी माहीत झाली. तिच्यावर प्रीति असल्याशिवायच नारदस्वामींनीं दिलेलं पारिजातकाचं पुष्प तिच्या वेणींत गेलं नं?

**कृष्ण.**– (हसून) वेडीरे वेडी ! त्या फुलासाठींच का हा आकांत केला होतास ! अग, तें पुष्प तुलाच देण्याचा बेत करून मी सभेंतून उठलों आणि आईकडे जात होतों, तों ती मार्गांत भेटली. मग मी विचार केला कीं, ही हावऱ्यासारखी फूल मागते, हिला हें एकच फूल देऊन हिची समजूत करावी आणि सत्यभामेच्या दारांत पारिजातकाचा वृक्षच लावावा. अग त्या पारिजातकाचीं फुलें ती तुझ्या मालकीच्या वृक्षाचीं नेऊं लागेल. चिंता करूं नको.

**सत्यभामा.**–खरं का पण हें? नाहीं तर इथलं बोलणं इथंच राहील.

**कृष्ण.**–तुला असें वाटतें काय? असो. सखे, आतां मंदिरांत चल. मी तुझी उत्तम वेणी घालतों व नानाप्रकारच्या अलंकारांनीं तुला भुषित करतों. ह्मणजे मग उभतांसही आनंद होणारी गोष्ट करूं.

(दोघें निघून जातात व पडदा पडतो.)

# प्रवेश ७ वा.

स्थळ—अमरावती—इंद्रसभा.

## पात्रें.

इंद्र, वरुण, अग्नी, यम, कुबेर, बृहस्पती, चोपदार वगैरे.

(इंद्र दुःखानें सिंहासनाखालीं पडला आहे व सर्व देव त्याचें सांत्वन करीत आहेत इतक्यांत पडदा उघडतो.)

**वरुण.**—सुरपते, आपण आतां दुःख करूं नये. शत्रूचा सूड उगविण्याची कांहीं तरी युक्ती काढून त्याप्रमाणेच वर्तणूक केल्याशिवाय परिणाम बरोबर नाहीं.

**अग्नि.**—पाकशासना, शत्रू जर समोर येऊन लढला असता, आणि आपण पराजित झालों असतों, तर गोष्ट निराळी होती; परंतु हा दुष्ट गुप्तरूपानें येऊन घाला घालून गेला. याचा शोध करून आम्हां सुधापानी आस शासन केल्याशिवाय राहाणार नाहीं. आपण तिळमात्रही दुःख करूं नये.

**यम.**—देवेंद्र महाराज, वीर पुरुषास शोकाचा निषेध लिहिला आहे. जर दुष्ट शत्रूनें मातेचा अपमान केला आहे; तर आपण त्याचा शोध करून त्याच्या सर्व कुटुंबाचा अपमान करूं. आपण काळजी करूं नये.

**कुबेर.**—अहो सुराधिश, जर आपण असा शोक करीत बसाल तर आम्हां सेवकांचें कांहींच बळ चालणार नाहीं. याकरितां

धैर्य धरून आपले वाचस्पती गुरू सर्वज्ञ आहेत त्यांस विचारावें ह्मणजे शत्रूचें नांवही समजेल ; आणि त्याच्या वधाची युक्तीही तेच सांगतील.

इंद्र.--देवहो, तुह्मी सर्व माझें शांतवन करतां, गुरूजीही सन्निधच आहेत, परंतु या वेळेस माझें हृदय दु:खानळानें करपून गेलें आहे. याचें कारण, जो पुत्र मातेस झालेलें दु:ख आपल्या नेत्रांनीं पहातो; त्याचें पौरुष, शौर्य, धैर्य व पराक्रम हीं सर्व लांच्छनास्पद होतात. आतां आपणास शोध करून त्याचा सूड उगाविण्याची, ह्मणून सवड इतकीच आहे कीं, त्याणें युद्ध केलें नाहीं कपट केलें. इतक्याच सवडीनें आपण कमी लांच्छनाला पात्र होऊं. असो, (गुरूस) गुरुवर्य, आपण सर्वज्ञ आहां. "गुरुबुद्धी विशेषत:" असें सर्व ह्मणत आले. तर आदिती मातेचीं किरीटकुंडलें नेणारा चोर कोण व त्याच्या वधाविषयीं उपाय काय करावा हें कृपाकरून कथन करा.

बृहस्पती.--देवेंद्रा, तुझ्या मातेचीं किरीटकुंडलें हरण करणारा तस्कर प्राग्ज्योतीषपुरांतील भौमासूर नामक दैत्य होय. त्याणें सर्व पृथ्वींतील नृपतींच्या कन्या जबर्दस्तीनें बंदींत घातल्या आहेत. तुह्मां सर्व सुरांबरोबर समर करण्याचाही त्याचा विचार आहे. आतां त्याचा वध करून अदितीचीं किरीटकुंडलें आणण्याचा उपाय एक आहे; तो

असा—सांप्रतकालीं, परमेश्वर भूभार उतरण्याकरितां द्वारकेंत अवतार घेऊन नांदतो आहे. त्या गोपालकृष्णास सर्वांनीं मिळून शरण जावें; ह्मणजे तो त्याचा वध करील व तुझेंही काम होईल.

इंद्र.—गुरुमहाराज, आपण फार चांगली युक्ती सांगितलीत. संकटसमईं संरक्षण कर्ते आपणच आहां हें मी जाणतों. आपली आज्ञा मला शिरसा वंद्य आहे. आतां सर्व देवांसह मी द्वारकेंत गमन करतों व हे वर्तमान कृष्णास सांगून त्याचें अभय घेऊन येतों.

बृहस्पती.—देवेंद्रा, तुझ्याबरोबर मीही द्वारावतींत येतों. परमात्म्याचे दर्शनाची मलाही इच्छा झाली आहे.

देवेंद्र.—ठीक आहे महाराज. आपण आमच्याबरोबर असल्यावर सर्व कार्यें सुलभ होतील.

(असें ह्मणून सर्व निघून जातात व पडदा पडतो.)

---

# प्रवेश ८ वा.

स्थळ—द्वारका—सत्यभामेचें मंदीर.

## पात्रें.

कृष्ण, सत्यभामा व इंद्रादिक सर्व देव.

(आनंदानें गोष्टी करीत असलेली सत्यभामा व कृष्ण प्रवेश करतात.)

(पडद्यापलीकडे शब्द होतो.)

## श्लोक.—शार्दूलविक्रीडित.

झाले मत्त निशाचरादि अवनी गौब्राह्मणां गांजिलें ॥ यासाठीं अवतार हा वसुमिता द्वारावती ही वळे ॥ निर्मूनी बहु भक्तरक्षण तुवां केलेंसकीं यादवा ॥ धर्मोद्धारक भक्तरक्षक असें गाती तुला माधवा ॥ १ ॥

कृष्ण.–(ऐकून) सत्यभामे, मंजीरा बाहेर आर्त स्वरानें कोणी तरी माझें स्तवन करीत आहे. ऐक बरें. (ऐकूं लागतात.)

(पुनः शब्द होतो.)

## आर्या.

नरकासुर येवोनीं, गुप्तत्वें अमरलोकिं एकाकी ॥ ने कुंडलें अदितिचीं, दुःखार्णवि देवतांप्रती टाकी ॥ १ ॥ यास्तव शरण तुला सुर, आलों दे दर्शनास पूर्ण दयें ॥ करुणा सिंधो देवा, हांक तुझ्या कांनि कां अजून नये ॥ २ ॥

सत्यभामा.–प्राणनाथ, खचित कोणत्या तरी दैत्यानें गांजलेले हे भक्त आपणांस हाका मारीत आहेत. (द्वामीम) फुले,

जाग मंदिराबाहेर प्राणनाथांचा कोणी शोध करीत असेल त्यास आंत घेऊन ये.

(दासी जाते व कांहीं वेळानें देवांसह परत येते.)

**सर्व देव.**–(प्रणामासह करुणास्वरानें) गोपालकृष्णा, आमचें रक्षण कर!

**कृष्ण.**–देवहो, स्वस्थ बसून तुमचें कोणापासून रक्षण करावें हें सांगा. (बृहस्पतीकडे पाहून) गुरूजी, मी वंदन करतों. (नमतो) हें आसन आहे, बसावें महाराज. (आसन दाखवितो.)

**गुरु.**–(बसल्या नंतर) गोपालकृष्णा, ज्या ज्या वेळेस देवांवर संकट पडतें, पृथ्वीला त्रास होऊं लागतो, धर्माचा क्षय होतो, भक्तांस दुःख भोगावें लागतें, त्या त्या वेळेस तूं अवतार घेऊन गोब्राह्मणांस सुखी करतोस, धर्माचा उद्धार करून भूमीचा भार दूर करतोस असा तुझा महिमा अगाध आहे. नारायणा, सांप्रतकाळीं प्राग्ज्योतीषपुरांत वास्तव्य करणारा भौमासुर नामक दैत्य ऐश्वर्यबलानें मदोन्मत्त झाला आहे. तो गुप्त रूपानें इंद्रलोकीं येऊन तस्कर कृतीनें अदितीचीं किरीटकुंडलें घेऊन गेला. यासाठीं सर्व देव सह हा इंद्र तुला शरण आला आहे. तर याचें भय निवारण कर, आणि अदितीचीं किरीटकुंडलें आणून दे. देवांचें संकट निवारण करावें हें तुझें कर्तव्य आहे.

**कृष्ण.**–गुरूजी, आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे. मी

**श्लोक.**—शार्दूलविक्रीडित.

झाले मत्त निशाचरादि अवनी गोब्राह्मणां गांजिलें ॥ यासाठीं अवतार हा वसुमिता द्वारावती हीं बळें ॥ निर्मूनी बहु भक्तरक्षण तुवां केलेंसकीं यादवा ॥ धर्मोद्धारक भक्तरक्षक असें गाती तुला माधवा ॥ १ ॥

**कृष्ण.**–( ऐकून ) सत्यभामे, मंदिरा बाहेर आर्त स्वरानें कोणी तरी माझें स्तवन करीत आहे. ऐक बरें. (ऐकूं लागतात.)

(पुनः शब्द होतो.)

## आर्या.

नरकासुर येवोनीं, गुप्तत्वें अमरलोकिं एकाकी ॥ ने कुंडलें अदितिचीं, दुःखार्णवि देवतांप्रती टाकी ॥ १ ॥ यास्तव शरण तुला सुर, आलों दे दर्शनास पूर्ण दयें ॥ करुणा सिंधो देवा, हांक तुझ्या कांनिं कां अजून नये ॥ २ ॥

**सत्यभामा.**–प्राणनाथ, खचित कोणत्या तरी दैत्यानं गांजलेले हे भक्त आपणांस हाका मारीत आहेत. (दासीस ) फुले,

जाग मंदिराबाहेर प्राणनाथांचा कोणी शोध करीत असेल त्यास आंत घेऊन ये.

(दासी जाते व कांहीं वेळानें देवांसह परत येते.)

**सर्व देव.**—(प्रणामासह करुणास्वरानें) गोपालकृष्णा, आमचें रक्षण कर!

**कृष्ण.**—देवहो, स्वस्थ बसून तुमचें कोणापासून रक्षण करावें हें सांगा. (बृहस्पतीकडे पाहून) गुरूजी, मी वंदन करतों. (नमतो) हें आसन आहे, बसावें महाराज. (आसन दाखवितो.)

**गुरु.**—(बसल्या नंतर) गोपालकृष्णा, ज्या ज्या वेळेस देवांवर संकट पडतें, पृथ्वीला त्रास होऊं लागतो, धर्माचा क्षय होतो, भक्तांस दु:ख भोगावें लागतें, त्या त्या वेळेस तूं अवतार घेऊन गोब्राह्मणांस सुखी करतोस, धर्माचा उद्धार करून भूमीचा भार दूर करतोस असा तुझा महिमा अगाध आहे. नारायणा, सांप्रतकाळीं प्रागज्योतीषपुरांत वास्तव्य करणारा भौमासूर नामक दैत्य ऐश्वर्यबलानें मदोन्मत्त झाला आहे. तो गुप्त रूपानें इंद्रलोकीं येऊन तस्कर कृतीनें अदितीचीं किरीटकुंडलें घेऊन गेला. यासाठीं सर्व देव सह हा इंद्र तुला शरण आला आहे. तर याचें भय निवारण कर, आणि अदितीचीं किरीटकुंडलें आणून दे. देवांचें संकट निवारण करावें हें तुझें कर्तव्य आहे.

**कृष्ण.**—गुरुजी, आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे. मी

अविलंबानेंच त्या मत्त भौम तस्कराचा वध करून अदिती मातेचीं किरीटकुंडलें आणून देईन. (इंद्रास) देवेशा, तूं आतां त्या दैत्याचें भय मनांत न बाळगतां सुखेनैव अमरावतीस गमन कर.

**इंद्र.**—महाराज, याप्रमाणें आपला आश्रय आहे; ह्मणूनच्च अमरपुरींतील अप्रतिम राज्याचा उपभोग मी घेत आहें. नाहीं तर दैत्यांनीं माझा कधींच चुराडा उडविला असता! असो. आतां सर्वस्वीं काळजी आपणांस आहेच. आह्मीं गमन करतों.

(प्रणाम करून बृहस्पतीसह सर्व देव निघून जातात )

**कृष्ण.**—प्राणसखे, ऐकलेंस ना त्या भौमासुरानें देवांस कसें दीनवाणें केलें आहे तें! आतां मला त्या दैत्याधमाबरोबर युद्ध करण्याकरितां गेलें पाहिजे. तूं स्वस्थ मंदिरांत रहा, ती जर या ठिकाणीं येऊन तुला कांहीं अधिक उणें बोलली तर मी आल्यावर मला सांग. मी खचित अपराधानुरूप शासन केल्याशिवाय राहणार नाहीं.

**सत्यभामा.**—इतकें कशाला हवें पण? मी बरोबरच्च येतें ह्मणजे सर्व कटकटी आपाप मिटल्या कीं नाहीं?

## श्लोक.—(वसंततिलका.)

**वाटे बहू नवल ऐकुनि युद्ध लीला ॥ येऊन संगर विलोकिन सांग डोळां ॥ आला प्रसंग सहजें न**

अता पुढें ये ॥ ही आस माझि पुरवा बहुतां उपायें. १

प्राणनाथ, आपण कांहीं या वेळेस नाहीं ह्मणूं नये.

कृष्ण.–सत्यभामे, युद्धाच्या गोष्टी स्त्रियांनीं घरांत बसून ऐकाव्या. त्यांस रणांत येणें सुखावह नाहीं.

श्लोक.—(मालिनी.)

रणि शर सुटताती मेघधारा समान ॥ अगणित मरताती वीर जे कां महान ॥ प्रळय समच भासे युद्धभूमींत जातां ॥ कशि गति तुझि तेथें होय तें सांग आतां ॥ १ ॥ धड धड धड ऐसे होति आवाज फार ॥ भड भड भड वाहे मांस शोणीत पूर ॥ तट तट तुटताती मस्तकें सैनिकांचीं ॥ जरि घट भट तेथें शुद्धि जाते तयाची ॥ २ ॥

सत्यभामे, अशाप्रकारच्या रणांत तुझा टिकाव कसा होईल? मला तर असें वाटतें कीं,—

श्लोक.—(मालिनी.)

कमल सम मुखासी काळिमा तेथ येई ॥ टवटवि शरिराची जाउनी म्लान होई ॥ तयिं समर क-

रूं कीं सावरूं सांग मातें ॥ रण चरित पहातां सौख्य नाहींच कांते ॥ १ ॥

**सत्यभामा.**—प्राणनाथ, आह्मी स्त्रिया कोमलपणा करतों, ह्मणूनच कोमल नाहीं तर आमच्यासारखं कठोर कोणीच नाहीं. तशांत मी आपणांसारख्या महा वीराची कांता, वीरसुता, आपण बरोबर असतांना मला दुःख कशाचं होणार आहे? (गळ्यास मिठी मारून) प्रियकरा, माझे हेतु आपणावांचून कोण पूर्ण करील बरें! वेळ पडली तर युद्ध करून सुद्धां आपणांस क्षणभर विश्रांती देईन.

**कृष्ण.**—( किंचित् विचार करून ) भामे, तूं फार दुराग्रही आहेस. असो. निघण्याची सर्व तयारी कर् मी जाऊन सैन्य सिद्ध करतों.

**सत्यभामा.**—ठीक आहे. (असें ह्मणून दोघें निघून जातात. नंतर पडदा पडतो.)

---

# प्रवेश ९ वा.

स्थळ—प्राग्ज्योतिषपुर—भौमासुराची राजसभा.

## पात्रें.

भौमासूर, प्रधान, इतर सभासद्दैत्यमंडळ व हेर.

( भौमासूर सर्व मानकऱ्यांसह बसला आहे इतक्यांत पडदा उघडतो व हेर प्रवेश करतो.)

**हेर.**–(मुजरा करून) महाराज, नगराबाहेर कोस्यावधी यादव वीर युद्धाच्या तयारीनिशीं येऊन उतरले आहेत. त्यांत प्रमुखस्थानीं गोपालकृष्ण असून देवांच्या कैवारास्तव, आपल्याजवळ तो युद्ध करणार; अशी जनवार्ता श्रवण करून सांगण्याकरितां प्राप्त झालों आहें. क्षमा असावी.

**भौमासूर.**–(ऐकून प्रधानास) प्रधानजी, हेरानें काय सांगितलें हें आपण श्रवण केलें ना!

**प्रधान.**–होय महाराज, आपण त्याविषयीं कांहीं काळजी करूं नये.

## श्लोक.—(भुजंगप्रयात).

करीं घेति जे भल्ल शक्ती त्रिशूळ ॥ धनु बाण भातें तशी भिंदिमाळ ॥ असिलता तोमर ठेवणारें ॥
सदां युद्द उत्सूक हें सैन्य सारें ॥ १ ॥

**भौमासूर.**–शाबासरे मुत्सद्दी! योग्य तयारी आहे. तर–

## आर्या.

घाला घाव निशाणा, हाणा यादव धरा तया चोरा॥
देवांच्या कैवारें, आला कारागृहीं तया थारा ॥१॥

**प्रधान.**–आज्ञा महाराज, अशीच तजवीज करतों. आपण स्वस्थ असावें.

**भौमासूर.**– प्रधानजी, या वेळेस मलाहि स्वस्थ बसून उपयोग नाहीं. तो काळा महा कपटी आहे. युद्धाच्या सामग्रीनें माझा रथ भरून तयार करा. त्या गवळ्यानें आजपर्यंत आह्मां दैत्यांचे फारच अपराध केले आहेत त्याचा सूड घेतला पाहिजे.'

**प्रधान.**–जशी आपली इच्छा असेल तसें. मी रथ सिद्ध करतों.

**भौमासूर.**–चला तर मीहि स्त्रियेला भेटून येतों.

( सर्व निघून जातात व पडदा पडतो. )

---

# प्रवेश १० वा.

स्थळ–इंद्रसभा.

## पात्रें.

इंद्र, वरुण, अग्नी, यम, कुबेर, बृहस्पती, एक गंधर्व, कृष्ण व सत्यभामा.

( बृहस्पती आदिकरून देवांसह इंद्र बसला आहे तों पडदा उघडतो व रण पाहून आलेला गंधर्व प्रवेश करतो. )

**गंधर्व.**–(इंद्रास नमस्कार करून) महाराज, आपण सांगितल्याप्रमाणें युद्धचमत्कार व तेथील साद्यंत हकीगत समजून घेण्याकरितां गेलों होतों तो प्राप्त झालों आहें.

**इंद्र.**–काय वर्तमान आहे?

**गंधर्व.**–वर्तमान काय? गोपालकृष्ण विजयी झाला. मी पुष्पवृष्टी होतांच आपणास कळविण्याकरितां येथें प्राप्त झालों.

इंद्र.–अरे सुमुखा, मी तुला पाठविल्यापासून काय काय वर्तमान झालें तें साद्यंत कथन कर.

गंधर्व.–आपण मला गुप्तरूपें कृष्णाबरोबर रहाण्यास आज्ञा केली; तेव्हां मी यादव सेना मार्गांतच असतांना त्यांस गांठून त्यांच्याबरोबर मार्ग क्रमण करूं लागलों. नंतर कांहीं दिवसांनीं दैत्याच्या नगराला वेढा पडला व ती बातमी भौमासुरास समजतांच—

## श्लोक.— (मदिरा.)

सिद्ध करोनि चमूसह आपण ये रणमेदिनि तो सुरवैरी ॥ शौर्य जया अनिवार वदे जिरवीन मि संगरिं यादव खैरी ॥ स्तंभ रणीं पुरती बहु वाजति वाद्य समुह भयंकर नादें ॥ सर्वही वीर जनाप्रति तो रव कंदनिं कीर्ति करा अनुवादे ॥१॥

## श्लोक.— ( शालिनी ).

दोन्ही सेना झुंजताती रणांत ॥ हाणा मारा सर्व तो हीच मात ॥ शस्त्रें अस्त्रें सोडिती शौर्यवान ॥ वीरश्रीतं पारका कोणिही न ॥ १ ॥

याप्रमाणें रणधुमाळी माजली असतां पदाती, अश्वस्वार, गजस्वार, रथी, अतिरथी, महारथी, पटाईत, चक्रधर असे ना-

याप्रकारेंच युद्ध विशारद वीर जणों आपल्या कसबाची परिक्षाच दाखवितांहेत; बाणांचा तर पर्जन्यच पडूं लागला त्यायोगानें सूर्यमंडळही दिसेनासें झालें, अंधःकार पडला, कोणी कोणास ओळखीना.—

## साक्या.

यापरि कंदन बहुदिन झालें, पडली दानव सेना॥
यादव वीरांकडे जयश्री, भौमा वरें दिसेना ॥१॥
आला समरासी मग आपण, बसुनि रथीं वेगानें ॥
श्रीहरिसी लक्षोनि जातसे शार्दुलसा रागानें ॥ २॥

## दिंडी.

युद्धिं अतिशय तो, निपुण भौमवीर ॥ कोटिच्या-
कोटी, सोडियले तीर ॥ यादवांसी भय, वाटलें
मनांत ॥ पळे रण सोडुन सैन्य काननांत ॥१॥

सर्व.—अरेरे! फार वाईट गोष्ट झाली बरें, पुढें काय झालें?

गंधर्व.—आपलें सैन्य दैत्याचे भयानें त्रस्त झालें असें पाहून.—

## श्लोक.—(कामदा).

श्रीहरी मनीं थक्क जाहला ॥ चाप घेउनी शीघ्र

धांवला ॥ सैन्य थांबवी धीर देउनी ॥ क्रोध ये तया फारची मनीं ॥ १ ॥

त्या वेळेस गोपालकृष्णानें जी भयंकर बाणवृष्टी केली तिचें तर वर्णनच करवत नाहीं.

## साक्या.

बाणांचा पर्जन्य पडे अति तुटती शिरें बहूत ॥
गज अश्वादी पडती भूवरि, नाचति भुतं रणांत १
शोणित नादि तेथोनि निघे ती, सिंधूमाजि मिळाली॥
प्रेतें वाहति अतिशय मांसें, कर्दम भूमी झाली॥२॥

याप्रमाणें अघटित कदन करून जेव्हां कृष्णानें भीमासुराला समोर गांठला तेव्हां—

## श्लोक.—(शालिनी.)

बोले दैत्या फार गांजलेंस ॥ भू धेनू तें देवतादी द्विजांस ॥ प्रायश्चिता घेउनी शुद्ध होई ॥ माझ्या बाणें मृत्युपंथास जाई ॥ १ ॥

बृहस्पती.—गोपालकृष्ण यथार्थच बोलला. नंतर—

गंधर्व.—याप्रकारचे गोपालकृष्णाचे शब्द ऐकतांच त्याला फार क्रोध आला व डोळे लाल करून उद्धटपणानें बोलूं लागला—

**श्लोक.**—(शार्दूलविक्रीडित.)

रे मंदा मतिहीन यादववरा काळच्या तुला लाज न ॥ गोपी मारिति गोकुळीं पशुपरी दावें गळां घालून ॥ तें सारें विसरोनि आज समरीं झुंजोनि माझ्या सवें ॥ रे मूढा मरतोस कां पळ घरीं जा खेळ गोपांसवें ॥ १ ॥ त्वां चोरी करणें वनांत फिरणें गाई ह्मशी चारणें ॥ गोपी भोंदुनियां वृजांत वसणें दांडू विटी खेळणें ॥ बुद्धी केवि तुला अशी उपजली भोगावया आपदा ॥ या युद्धीं तुजला नये जय कधीं होशील दुःखी सदा ॥ २ ॥ माझे सायक तीक्ष्ण जीवित तुझें संरक्षिती ना कधीं ॥ यासाठीं अभिमान सोडुन धनू अर्पी त्वरें मत्पदीं ॥ भौमासूर महा पराक्रमि सुरां माहीत ना कीं असे ॥ गौळच्या सत्य तुला कुदैवच तुझा मृत्यू मुखीं देतसे ॥ ३ ॥

याप्रमाणें निंद्योक्ती व गर्वोक्ती श्रवण करून गोपालकृष्णास अतीशयच क्रोध आला, बाहू स्फुरण पावूं लागले, मुख तर

असें दिसूं लागलें कीं, आतां हा क्षणांत ब्रह्मांड भस्म क-रील कीं काय ! आणि त्या दैत्याला शेवटचेच जणूं शब्द सांगितले. ते कोणते ह्मणाल तर—

## श्लोक.—(शार्दूलविक्रीडित).

सैन्याला मि तुझ्या पुढें दवडिलें तूं जा अतां लौकरी ॥ जेव्हां होतिल यातना तंव तुला वाटेल कीं हा हरी ॥ याणें मत्सम मत्त हत्ति वधिले ही साक्ष घेई मनीं ॥ ऐसें बोलून सायकाप्रति तदां सोडी न कोणीं गणीं ॥ १ ॥

## दिंडी.

भिडति जय आशा धरुनियां मनांत ॥ महायोद्धे ते भौम कृष्णनाथ ॥ सत्यभामा हरि मूख पाहताहे ॥ अती श्रम झाले घर्म वाहताहे ॥१॥
वदे नाथा मी करिन संगरासी ॥ कृपा तुमची तरि वधिन दानवासी ॥ युद्ध इच्छा उपजली बहु अंगीं ॥ प्रिया द्यावें धनुबाण मला वेगीं ॥ २ ॥

कुबेर.—शाबास सत्यभामे, वीरपत्नी खरी तूं. नंतर—

गंधर्व.— **श्लोक.**—(शालिनी.)

स्त्रीच्या बाणें मृत्यु या दानवासी ॥ जाणोनीयां दे धनू बाण तीसी ॥ बोले वेगीं मार जा दुर्जयाते ॥ ख्याती तूझी या जगीं होय कांते ॥१॥

वरुण.—( बृहस्पतीस ) गुरुश्रेष्ठ, त्या वेळेस गोपालकृष्णानें दैत्याला दुर्जय कां ह्मटलें बरें!

बृहस्पती.—अरे वरुणा, वीरांचा धर्म निरभिमानी आहे. गोपालकृष्णानें युद्ध करून त्याला जर्जर केला असेलच; परंतु आपल्या बाणानें यास मरण येत नाहीं असें जाणून त्यास दुर्जय ह्मटलें व सत्यभामेस त्याजबरोबर युद्ध करण्याची आज्ञा दिली. असो. (गंधर्वास) नंतर—

**श्लोक.**—(शार्दूलविक्रिडित).

कृष्णाज्ञा शिरिं वंदुनीं मग सती आली त्वरें संगरा॥
पाहोनी भय वाटलें मनिं बहु त्या मत्त भौमासुरा॥
बोले तूं गजगामिनी शशिमुखा कां या रणीं सुंदरी॥
माळा घाल गळां सुखी करिन गे नेवोनियां मांदिरीं १

त्या दुष्टाच्या मुखांतील असे शब्द ऐकतांच सत्यभामेस अतिशय कोप आला व नेत्र आरक्त करून वीरश्रीनें व्याप्त

अशी भौमासुराप्रत युद्धास पाचारण करूं लागली. मला तर त्या वेळेस असेंच वाटलें कीं, महिषासूर वधासाठीं आदिशक्तीनें जो अवतार घेतला होता तोच हा आहे.

इंद्र.—सत्यभामेस पहातांच जर भौमासुरास भय वाटलें तर तो असें का बोलला बरें?

बृहस्पती.—अरे, मूर्खच तो ह्मणून तिला माळा घाल ह्मणाला. ज्ञानी असता तर कृष्णाबरोबर युद्ध न करतां त्यास शरणच आला असता.

इंद्र.—खरी गोष्ट आहे महाराज. (गंधर्वास) सुमुखा, नंतर काय झालें?

गंधर्व.—जेव्हां सत्यभामा त्याला युद्धाकरितां पाचारण करूं लागली, तेव्हां तो तिच्या प्रत्येक शब्दानें मोहित होऊं लागला, त्यास कांहींच सुचेनासें होऊन त्यानें हातांतील शस्त्र खालीं टाकलें व सत्यभामेस ह्मणूं लागला कीं,

## श्लोक.—(मालिनी.)

भ्रम अति मज झाला पाहुनि रम्य कांती ॥ धनु करिं धरवेना येउनी देई शांती ॥ रतिसमर कराया लौकरी चाल गेहीं ॥ सहज सुखद तें हो आपणालागिं पाहीं ॥ १ ॥

हे शब्द ऐकतांच, त्या साध्वीला अतिशय क्रोध आला व कृष्णानेंच आपल्या हातानें बाण काढून दिला होता तो धनुष्यावर सज्ज करून तिणें भौमासुरास निर्वाणचे शब्द सांगितले—

श्लोक.—(शालिनी.)

रेरे दुष्टा दानवा अंत तूझा ॥ आला आतां साहिरे बाण माझा ॥ बोलोनीयां यापरी सायकातें ॥
सोडोनीयां भेदि वक्षस्थलातें ॥ १ ॥

असें होतांच आकाशांतून युद्ध पहात असलेल्या गंधर्वांनीं, जयवाद्यें वाजवून पुष्पवृष्टि केली व जसा महावातेंकरून एकादा वृक्ष उन्मळून अकस्मात् भुमीवर पडतो, तद्वत् भौमासुर रथांतून खालीं पडला. हें पाहून कृष्णानें सत्यभामेस आलिंगन दिलें व शांत केली. नंतर घायाळ होऊन पडलेला भौमासूर गोपालकृष्णाची स्तुति करूं लागला ती अशी:—

श्लोक.—(शार्दूलविक्रीडित.)

हे देवा मधुसूदना नगधरा नारायणा केशवा ॥
वैकुंठाधिपते अगम्य चरिता हे निर्मला माधवा ॥
गोपी मानस रंजना जगपते विश्वेश्वरा श्रीहरी ॥
होतों आजवरी तुला विसरलों तारीं मला लौ-

करी ॥१॥ क्षीराब्धींत भुजंग मंचकिं सदां निद्रिस्त तूं राहसी ॥ भक्तें संकटिं बाहतांक्षणिं तयां तारावया धांवसी ॥ गाती नारद तुंबरादि गुण हे तूझे अलापस्वरीं ॥ होतों० ॥ २ ॥ दुष्टांच्या हननार्थ तूं जगपती येतोस या भूवरी ॥ धर्मस्थापन साधुपालन तुझें हें ब्रीदगा श्रीहरी ॥ आहे मी जरि फार पातकि तरी वात्सल्य घे अंतरीं॥ होतों० ॥ ३ ॥ दुष्कर्मीं रतलों तुला न भजलों केलीं महा पातकें ॥ नाहीं ब्राह्मण पोषिले न पुजिले कीं वंदिले त्या निकें ॥ पुण्यक्षेत्र न पाहिलें न धुतलें हें अंग तीर्थांतरीं ॥ होतों० ॥ ४ ॥

याप्रमाणें स्तुति ऐकतांच गोपालकृष्णास त्याची दया आली.

इंद्र.–गोपालकृष्णाला त्याची दया आली तेव्हां गोपालकृष्णानें त्यास काय दिलें ?

गंधर्व.–सत्यभामेसहवर्तमान गोपालकृष्ण त्याचेजवळ जाऊन त्यास असें बोलला कीं, कांहीं तरी वर माग.

इंद्र.–(गुरूस) काय हो, गुरूजी ; गोपालकृष्ण जेव्हां त्या दे-

त्याला वर देण्यास सिद्ध झाला; त्यावेळेस त्याणें जर माझेंच पद मागीतलें असतें तर?

**बृहस्पती.**—अरे, ज्याला उपरती झाली, पश्चात्तापानें आपल्या पातकांचा जो उच्चार करूं लागला, तो इंद्रपद कशाला मागेल? साक्षात् जगन्निवास पुढे उभा असतां मोक्ष कां नाहीं मागणार? (गंधर्वास) कायरे, त्याणें मग वर काय मागितला?

**गंधर्व.**—तो असें बोलला कीं, आतां माझा तर क्षणभरानें अंत होणारच; परंतु माझी कीर्ति चंद्रार्कपर्यंत राहील व प्रत्येक वर्षी माझें स्मरण सर्व जगतास होईल असा कांहीं वर दे. तेव्हां गोपालकृष्णानें त्यास सांगितलें कीं, भौमासुरा आज अश्विन वद्य चतुर्दशी आहे, व आज सूर्योदयाच्या आधींच माझ्या प्रियेनें तुझा वध केला आहे, तर या तुझ्या मरण दिवशीं सर्वलोक सूर्योदया अगोदर स्नानें करतील व आजपासून तुला नरकासूर असें ह्मणतील. तुझ्या प्राणांतीं तुला माझें दर्शन झालें आहे, याकरितां तुला मोक्षप्राप्ति होईल. असें ऐकतांच भौमासूर कांहींसा आनंदित झाला व कृष्णास सांगूं लागला कीं; परमेश्वरा, माझ्या हृदयांत जो मातोश्रीचा बाण लागला आहे तो काढून घे, मला मरणसमयीं याच्या वेदना सहन होत नाहींत. हें ऐकून कृष्णानें त्याच्या हृदयांतील बाण काढून घेतला

आणि माजकडे अमृत दृष्टीनें पाहतांच सर्व वेदना दूर झाल्या व कृष्णस्वरूप न्याहळीतच त्याणें देहावसान केलें.

इंद्र.–( गुरूस ) गुरुमहाराज, हा मोठा चमत्कार आहे. जे दैत्य महापातकें करतात, ब्राह्मणांस त्रास देतात, धर्माचा उच्छेद करतात व आह्मांला शक्तिहीन करण्यासाठीं अनेक उपाय करतात; ह्मणून आह्मी ईश्वराजवळ ज्यांची गाऱ्हाणीं सांगतों, त्यांसच परमेश्वर मुक्त करतो व आह्मी मोक्षाची इच्छा करीत असतांही आह्मांस तो मिळत नाहीं. परमेश्वराच्या घरीं हा उलटा न्याय कसा ?

बृहस्पती.—देवेंद्रा, ते दैत्य जरी जन्मापासून महान् पातकें करतात; तरी अंतीं त्यांस पश्चात्ताप होतो, "पश्चात्तापेन शुद्धंती" या ह्मणीप्रमाणें ते शेवटीं शुद्ध होऊन भगवंताच्या सन्निध रहाण्याचे योग्यतेस येतात.

इंद्र.–असो, सुमुखा, नंतर काय वर्तमान झालें?

गंधर्व.–भौमासूर प्राणत्याग करीत आहे इतक्यांत भौमकांता आपल्या भगदत्त पुत्रासह त्या ठिकाणीं आली, आणि अपार शोक करून ह्मणूं लागली कीं,

## साक्या.

बोला कांहीं मजसी न रुसा जरि घडले अपराध ॥
पदर पसरित्यें क्षमा करावी न करा मायारोध ॥ १ ॥

प्रेमेंकरुनी आजवरीं मज आलिंगितसा नाथा ॥
आतां या अबलेला सोडुनि कां परलोकीं जाता २
घोर पराक्रम करुनी अवनी गाजविली परि आज॥
कीर्ती सारी टाकुन केली रणभूमीवरि शेज ॥३॥

## आर्या.

न्यावें मज मी येतें, न रुचे मज सौख्य येथचें
नाथा ॥ शून्य जगत्रय भासे, तुह्मांविण जीव
हा नको आतां ॥ १ ॥

## श्लोक.—(शालिनी.)

हाहा दैवा निर्दया काय केलें ॥ सौभाग्याचें तारुं
माझें वुडालें ॥ नाथा कांहो सोडुनी दीन दासी ॥
एकाएकीं होतसा स्वर्गवासी ॥ १ ॥

अशा शोकार्णवांत ती पडली आहे; तों गोपालकृष्ण तिच्याजवळ जाऊन प्रेम वचनांनीं तिचें शांतवन करून ह्मणाला कीं, आतां तूं शोक करूं नको, भौमासूर सद्गतीला गेला आहे. मी तुझ्या पुत्राला राज्यावर वसवितों, प्रधानादिकांकडून राज्य सुनितीनें चालीव ह्मणजे अंतीं तुलाही सद्गती प्राप्त होईल.

मात्र अदितीचीं किरीटकुंडलें आणून दे. असें सांगतांच भौमासुराचा प्रधान किरीटकुंडलें घेऊन आला, तीं गोपालकृष्णानें आपल्या जवळ घेऊन भगदत्तास राज्यावर बसविण्याची आज्ञा करून भौमासुराचें अंतकर्म करावयास सांगितलें, आणि अन्यायानें कारागृहांत टाकलेले कोणी बंदिवान असतील त्यांस मुक्त करावें अशा बेतानें कारागृह मोकळें केलें तों आंतून सोळा हजार एकशें अविवाहित राजकन्या बाहेर पडल्या व कृष्णास ह्मणूं लागल्या कीं, भौमासुरानें आह्मांस अन्यायानें बंदींत टाकलें होतें, आज आपल्या कृपेनें आमची मुक्तता झाली; तर आमचें पाणिग्रहण आपणच करावें. आह्मां अविवाहित अबलांस आतां आपल्यावांचून कोणाचाच आश्रय नाहीं. असे त्यांचे करुणायुक्त शब्द श्रवण करून त्यांस कृष्णानें असें सांगितलें कीं, माझ्या सैन्याबरोबर तुह्मी सर्व जणीं द्वारकेस जा. मी इंद्रलोकीं जातों तेथून आल्यावर तुमचा अंगिकार करीन. असें सांगून सर्व स्त्रियांसह सैन्य द्वारकेंत पाठवून दिलें आणि इकडे निघण्याकरितां गरुडास पाचारण केलें हें पाहून आपणास सांगण्याकरितां त्वरेनें येथें प्राप्त झालों.

इंद्र.—देवहो, सुमुखाच्या सांगण्यावरून गोपालकृष्ण अमरावतींत येण्यास अवधी राहिली नाहीं तर याच वेळेस जितकी शीघ्रता होईल तितकी करून अमरावतींत आनंदप्रदर्शक चिन्हें, गुढ्या, तोरणें, ध्वज, पताका इत्यादि उभ्या करा,

मार्गांत चंदनाचे सडे घालून जयवाद्यांचा घोष चालूंद्या. कृष्ण पूर्व दिशेकडून प्राप्त होईल तिकडे उत्तम गाणारे गंधर्वांचें गायन चालूंद्या. आणि नानाप्रकारचीं वाद्यें वाजवीत व मंगल गीतें गात गात काहीं देव, गंधर्व आणि अप्सरा गोपालकृष्णास सामोरे जा.

**वरुण.**—आज्ञा महाराज, सांगितल्याप्रमाणें नगरांत आनंद प्रदर्शन करतों.

**कुबेर.**—महाराज, आज्ञेप्रमाणें गोपालकृष्णास सामोरे पाठवि-ण्याची योजना करतो व सभेंतही गायन करण्याकरितां काहीं गंधर्व आणि अप्सरा पाठवून देतों. (असें म्हणून दोघे निघून जातात.)

(नंतर गरुडावर बसलेला कृष्ण सत्यभामेसह प्रवेश करतो.)

**सर्व देव.**—(उत्थापन देऊन) यावें द्वारकाधीश !

**इंद्र.**—(कृष्णाचा हात धरून आपल्या आसनावर बसवितो व आपण उभा रहातो)

**कृष्ण.**—(सर्वांकडे पाहून) बसा सर्व. (देवेंद्रास) अमराधिशा, बैस. (त्यास आपल्या शेजारीं बसवितो व गुरूस पाहून) वाचस्पते, वंदन करतों. (नमतो).

**बृहस्पती.**—विजयोस्तु. देवाधिदेव तूं, मीच तुला वंदन करावें.

**कृष्ण.**—"वर्णानां ब्राह्मणो गुरुः" महाराज, मी यादववंशी आहें, आपण मला पूज्यच आहां. (इंद्रास) पाकशासना, भौमासु-

राचा वध केला हें तुला समजलेंच असेल. (किरीटकुंडलें देतो) हीं आभरणें अदिती मातेला नेऊन दे.

इंद्र.–(घेऊन) प्रभो, आपण सर्वसाक्षी आहां. वारंवार या देवतांसाठीं श्रम करून सर्वांस सुखी करता, वेळोवेळीं अवतार घेऊन भूभार हरग करता; अशा आपल्या अनेक लीला वेद, सरस्वती, ब्रह्मदेव, शेष इत्यादि वर्णन करतांना कुंठित झाले, तर मी यःकश्चित पामर आपली स्तुति काय करणार आहे? सर्व कर्ते करविते आपणच आहां. हें मी पूर्णपणें जाणतो. ज्या वेळेस मला गर्व झाला त्या वेळेस आपणच गोवर्धनस्वरूप धारण करून गर्वकरच छेदन केलें; ब्रह्मदेवास गर्व झाला तेव्हां त्याणें गोप, धेनू, वत्सें इत्यादि नाहींशीं केलीं. त्याचा गर्व छेदन करावा या हेतूनें; गोप, वत्सें इत्यादिकांचीं रूपें स्वतांच धारग करून गोकुळांत आनंदानें एक वर्ष क्रीडा केली व ब्रह्मदेवाचा गर्व हरण केला. त्याप्रमाणें केवळ बाललीलेंतच पूतना, शकटासूर, अघासूर इत्यादि दुष्ट दैत्यांचा आपण वध केला. कालियास यमुना डोहांतून स्वपराक्रमानें हांकून दिलें व यमुनातीरवासी जनांस सुखी केलें, नव लक्ष गोपींचे मनोरथ षण्मासाची रजनी करून पूर्ण केले, बाहुबळानें कंसादि दुर्जनांचा संव्हार केला, आगखीही भूभार उतरण्याच्या हेतूनें सर्वस्वीं अर्जुनासह पांडवांस जसा देहच अर्पण केला आहे. असे

आपले गुणानुवाद वर्णन करून पूर्तता झालीशी वाटतच नाहीं. तरप्रभो, कृपेची वृद्धी असावी इतकीच प्रार्थना करून केवळ विनम्र भावानें आपणांस असा प्रश्न करितों कीं आपण तर माझें सर्वस्वीं प्रिय केलेंच व करीतही आहां; आतां या दासानें आपलें प्रिय काय करावें ?

कृष्ण.—अमरेश्वरा, शाबास! धन्य आहेस! तुझ्या या निष्कपट भाषणांनींच माझें प्रिय केलें. आणखी तें माझें प्रिय तुह्मी देव काय काय करण्याची इच्छा करीत आहां बरें!

इंद्र.—आह्मी देवता यःकश्चित, सर्व ब्रह्मांडाचे नायक आपण, आमच्या हातून आपलें प्रिय तें काय होणार! त्यांतूनही वस्त्राभरणांसहवर्तमान आपली पूजा करावी; अशी जी सर्वत्रांची इच्छा आहे ती पूर्ण केल्यास फार आभारी होऊं.

कृष्ण.—जशी सर्वत्रांची इच्छा असेल तसें. (याप्रमाणें कृष्णाचे शब्द ऐकतांच नानाप्रकारचे अलंकार, वस्त्रें इत्यादि आणून कृष्ण व सत्यभामेस अर्पण करतात. उभयतां सर्व वस्तूंचा अंगिकार करून) देवेंद्रा, तुह्मीं सर्वांनीं मिळून माझी पूजा केलीत त्या योगानें मला फारच संतोष झाला आहे. आतां मीही सर्वत्रांचा विनयपूर्वक निरोप मागतों. कारण—युद्धाचे श्रम करून सर्व सेना जय प्राप्तीमुळें मात्र आनंदित अशी द्वारकेंत गेली आहे. तिकडे बलरामदादा आहेत ते सर्वांचें प्रिय करतीलच; तरीही युद्धांत कोणाचे

—

श्रम किती झाले आहेत हें सर्व मला माहित आहे. याकरितां मी स्वता जाऊन त्यांना ज्या देणग्या, मान, किताब वगैरे यथान्याय देईन; त्या देणें बलराम दादांच्या हांतुन होणें नाहीं यासाठीं मी गमन करतों. लोभवृद्धी असावी. संकट समयीं स्मरण करतांच उपयोगीं पडेन. काळजी करूं नका.

इंद्र.—प्रभो, हे जगद्वंद्य, या यःकश्चितांबरोबर इतकीं लीनतेचीं भाषणें करून यांस मान देण्याचा धर्म तोच आपण केलात. आतां आपल्या इच्छेनुरूप आपण गमन करावें.

कृष्ण.—देवेंद्रा, उत्तम आहे; गमन करतों. जातांना तुझें नंदनवन सत्यभामेस दाखवून जाईन. कळवून ठेवतों.

इंद्र.—कळविण्याची गरज नवती. असो.

(सर्व निघून जातात व पडदा पडतो.)

---

# प्रवेश ११ वा.

## स्थळ—नंदनवन.

## पात्रें.

कृष्ण, सत्यभामा, वनरक्षक, इंद्र, बृहस्पती.

(कृष्ण व सत्यभामा वनशोभा पहात प्रवेश करतात.)

सत्यभामा.—प्राणनाथ, किती हो हें उद्यान रमणीय आहे!

आहाहा ! मला असें वाटतें कीं सारा दिवस जर हें पहात फिरलें तर क्षुधेची किंवा तृषेची आठवण सुद्धां होणार नाहीं.

**श्लोक.**—(शार्दूलविक्रीडित.

छाया शीतळ माजि सूर्य न दिसे विश्रांति वाटे मना ॥ शोभा रम्य मला गमे खचित कीं हो पारणें लोचना ॥ वारा मंद सुगंध वाहुनि सदां हृत्ताप हा घालवी ॥ जों जों आपण पाहतों तंव दिसे शोभा पुढेंही नवी ॥ १ ॥

**कृष्ण.**–सत्यभामे, खरोखरच या उद्यानाप्रमाणें दुसरें कोठेंच उपवन नाहीं.

**श्लोक**—(शिखरिणी).

प्रिये या उद्यानीं षडऋतु सदां वास करिती ॥ फलें पुष्पें सारे तरुवर सशोभीत दिसती ॥ नसे कोठें ऐसें वन अवनि आहे जरि मह्रा ॥ इथे भोगी सौख्या खरि पदरिं पुण्याइच पहा ॥ १ ॥

**सत्यभामा.**—खरेंचबाई, पुण्याईशिवाय असें सुख कोठून मिळणार आहे !

**कृष्ण.**–( किंचित पुढें जाऊन हातानें दाखवितो ) सत्यभामे–

**श्लोक.**—(शार्दूलविक्रीडित).

पाहें नारळि पोफळी खिरणिया आणीक रातांजन ॥ डाळिंबी वट निंब पिंपळ पुढें जाई जुई चंदन ॥ चंपावृक्ष वकूळ शेवरि तरु मंदार बिल्वादिक ॥ देती इच्छित कल्पवृक्ष अवघी शोभा दिसे आधिक ॥ १ ॥

सत्यभामा.–प्राणनाथ, आणखींहि पुढें जाऊन आपण हें सर्व उद्यान पाहूं.

कृष्ण.--माझ्याही मनांत असेंच आहे.

## आर्या.

वाळ्याचें बेट पहा, वासानें गगन भरितसे सारें ॥ हें केतकिबन शोभे, कांचन सम ज्यास टाकिलें भ्रमरें ॥ १ ॥

सत्यभामा.–प्राणनाथ, या केतकीच्या सुवासाला वेधलेले फणी, आपण या ठिकाणीं येतांच जाऊं लागले याचें कारण काय बरें?

कृष्ण.–सत्यभामे, तुझी वेणी सर्पांनीं पहातांच त्यांस आपल्या ठिकाणीं लज्जा उत्पन्न झाली; ह्मणून ते जाताहेत. दुसरें कांहीं कारण नाहीं.

**सत्यभामा.**—इतकं कांहीं वर्णन नको करायला माझं. ( दोघें कांहीं पुढें जाऊन ).

**कृष्ण.**—प्राणसखे, हें सरोवर अवलोकन कर, ज्यांत सूर्यविकासिनी व चंद्रविकासिनी कमलांची दाटी झाली आहे, प्रत्येक कमलावर भ्रमर गुंजारव करीत आहेत, आणि सुवास तरी किती मनोहर आहे! त्याप्रमाणेंच आम्र, फणस, पेरू इत्यादि वृक्ष फलभारानें नम्र होऊन पाहणाराच्या मनास क्षणभर कशी विश्रांती देत आहेत बरें!

( कोकिळेचा स्वर ऐकूं येतो ).

**सत्यभामा.**—प्राणनाथ, हें सरोवर अप्रतिम तर खरँच; पण इतक्यांत पिकस्वना शब्द करीत होती ती स्तब्ध कां राहिली बरें?

**कृष्ण.**—मनोरमे, हा सर्व तुझ्या बोलण्याचा प्रभाव आहे. कोकिलेसही वाटलें कीं माझ्याहून मंजूळ असा स्वर येतो तो ऐकावा.

**सत्यभामा.**—पुरेबाई, मी कांहीं जरी विचारलँ, तरी तें माझ्यावर आणायचँ; आतां कांहींच विचारीत नाहीं ह्मणजे भलतँच नको आयकायला.

**कृष्ण.**—सत्यभामे, तूं किती अज्ञान आहेस! मी सत्य बोललों तरी तुला विनोद वाटतो त्यास माझा उपाय नाहीं. प्राणसखे, खरोखर मी सांगतों तशीच तूं आहेस.

**सत्यभामा.**—बरँ असो. आपल्याच मनासारखँ कां होईना! आणखी वनशोभा पाहण्याकरितां पुढें जाऊं चला.

कृष्ण.—ठीक आहे चल. ( कांहीं पुढें जाऊन )—

**श्लोक.**—(मालिनी).

अगणित शुक मैना मोर हे नाचताती ॥
मधुर मधुर शब्दें शांति चित्तास देती ॥
मन बहुत रमे ही पाहतां यांचि लीला ॥
झडकरि अवलोकीं कस्तुरीका मृगाला ॥ १ ॥

सत्यभामा.—प्रियकरा, आपण मला कस्तुरिका मृग दाखविला तो पलायन कां करीत आहे बरें ?

कृष्ण.—प्रिये, आतां काय सांगूं! अगे, तुझे नेत्र पहातांच त्यास लाज वाटली व पळून गेला. तुला मी थट्टा केली असें वाटेल पण मी खरें कारण सांगितलें. असो. (कांहीं पुढें जाऊन)—

**श्लोक.**—(शार्दूलविक्रीडित.)

पाहे सांबर रोहि सिंह अवघे स्वेच्छें वनीं धांवती ॥
कोल्हे मांजर हें जवादि तरसें गेंडे ससे दीसती ॥
शार्दूलादिक रान सूकर हरी वृक्षावरी खेळती ॥
नाना याति जनावरें बघुनियां आनंद होतो अती. ॥

प्राणसखे, हा इंद्राचा शिकारखाना आहे.

सत्यभामा.—प्राणनाथ, आपण पुष्कळ वेळपर्यंत मला अरण्य

शोभा दाखवीत आहां; परंतु अद्याप पारिजातकाचा वृक्ष नजरेस पडला नाहीं; तो दाखवावा.

कृष्ण.—(कांहीं पुढें जाऊन) हा पारिजातकाचा वृक्ष. ज्याच्या एका पुष्पासाठीं तूं आकांत केला होतास.

सत्यभामा.—आतां हा वृक्ष जातानां बरोबर घेतला पाहिजे, आपण "तुझ्या दारांत पारिजातकाचा वृक्ष लावीन" असें मला सांगितलें होतें तें वचन पूर्ण करण्याचा हा उत्तम संधी आहे. कसें?

कृष्ण.—कसें ह्मणून काय विचारतेस? (वृक्ष उपटूं लागतो)

वनरक्षक.—(प्रवेश करून) महाराज, आपण येथील कोणत्याही वृक्षास, किंवा वस्तूस हस्तस्पर्श न करितां पहा. हात लावण्याचा हुकूम नाहीं.

कृष्ण.—कोणरे तूं!

वनरक्षक.—मी या वनाचें रक्षण करणारा माळी आहें.

कृष्ण.—हा पारिजातकाचा वृक्ष मी घेऊन जाणार.

वनरक्षक.—मी नेऊं देणार नाहीं. देवेंद्राला कळवून शासन करवीन.

कृष्ण.—जारे, देवेंद्र माझें काय करणार आहे तें पाहीन. (असें ह्मणून वृक्ष उपटूं लागतो, वनरक्षक इंद्रास कळविण्याकरितां जातो.)

सत्यभामा.—प्राणनाथ, तो वनरक्षक इंद्राला कळविण्याकरितां गेला असें वाटतें.

**कृष्ण.**–जाऊं दे, इंद्र आपण होऊनच वृक्ष देईल; अवलोकन कर.

(इतक्यांत बाण सोडीत इंद्र प्रवेश करतो.)

**इंद्र.**–(कृष्णास न ओळखून) दुष्टा तस्करा, "इंद्र माझें काय करील!" अशी वनरक्षकाजवळ गर्वोक्ती करून निःशंकपणानें वृक्ष नेतोस, तर या चौर्यकर्माबद्दल तुला योग्य शिक्षा करतों सहन कर. (असें ह्मणून बाण सोडतो, कृष्ण त्याचें निवारण करून त्यावर बाण सोडणार इतक्यांत गुरु प्रवेश करतो.)

**बृहस्पती.**–(कृष्णाजवळ जाऊन) दयानिधे, हे गोपालकृष्णा; धनुष्यावर बाणाची योजना करूं नको. देवेंद्रानें तुला ओळखल्याशिवाय बाण टाकला आहे याकरितां क्षमा कर. (इंद्राजवळ जाऊन) देवेंद्रा, अरे तो तस्कर नव्हे. गोपालकृष्ण तुला सांगून नंदनवन पहाण्याकरितां आला होता. तुला स्मरण नाहीं काय! जा, त्याचेजवळ क्षमा मागून त्याचे हेतु पूर्ण कर.

**इंद्र.**–आज्ञा महाराज. (असें ह्मणून जातो व कृष्णचरणीं मस्तक ठेवतो) देवाधिदेवा, मी अपराधी आहें क्षमा कर. मी तुला न ओळखतां केवळ दूत वचनावर विश्वास ठेऊनच बाण सोडला आहे.

**कृष्ण.**–देवेशा, ऊठ; चिंता नाहीं बाण टाकलास तरी. मात्र पारिजातकाचा वृक्ष मी द्वारकेंत घेऊन जाणार.

**इंद्र.**—गोपालकृष्णा, आपण हा वृक्ष उपटूं नये, कारण आपल्या कोमल करांस श्रम होतील. मी आपणांबरोबर एक गंधर्व देतों, तो आपल्या मस्तकावर वृक्ष घेऊन द्वारकेंत पोंचवील.

**कृष्ण.**—फार उत्तम आहे, आतां मी गमन करतों. मी द्वारकेंत पोंचण्याचे आधीं हा वृक्ष सत्यभामेच्या दारांत लागला पाहिजे.

**इंद्र.**—आज्ञा महाराज. अशीच तजवीज ठेवतों. आपण गमन करावें.

**बृहस्पती.**—गोपालकृष्णा, हे सर्व देव तुझे अंकित आहेत. तुझ्याच कृपेनें देवेंद्रास अमरावतीचें राज्य प्राप्त झालें आहे. सर्वोपरी तुझी कृपादृष्टी असावी अशी माझी हात जोडून विनंती आहे.

**कृष्ण.**—महाराज, मी यःकश्चित आहे. आपणांसारख्यांच्या कृपेनेंच आमचे पराक्रम चालतात. आपली कृपा इंद्रावर असली म्हणजे माझी असल्याप्रमाणेंच आहे. महाराज आतां कृपादृष्टी असावी. मी गमन करतों. वंदन करतों.

**सत्यभामा.**—गुरूजी, मी नमस्कार करतें.

**बृहस्पती.**—उभयतांचें कल्याण असो. (कृष्ण गरुडावर बसून सत्यभामेसह निघून जातो व इंद्र बृहस्पतीसह निघून जातो.)

(पडदा पडतो.)

# प्रवेश १२ वा.

स्थळ—द्वारका— सत्यभामेचें मंदीर.

## पात्रें.

कृष्ण, सत्यभामा, रुक्मिणी, पेंद्या.

(सत्यभामेसहवर्तमान कृष्ण प्रवेश करतो.)

**कृष्ण.**—सत्यभामे, तुझ्या दारांत पारिजातकाचा वृक्ष लावण्याचें मी कबूल केलें होतें त्याप्रमाणें वृक्ष लावला. आतां तुझी इच्छा पूर्ण झाली नां ?

**सत्यभामा.**—हें काय विचारणें! आपण हेतु पूर्ण करण्याचें मनावर घेतलें मग पूर्ण कां होणार नाहीं? (गळ्यास मिठी मारून) प्राणनाथ, मी तरी खात्रीनें असें ह्मणतें कीं, जशी आपली प्रीति माझ्यावर आहे, तशी कांहीं दुसरीवर नाहीं. त्या दिवशीं नारदस्वामी पुष्पाविषयीं सांगून गेले तों ती दुष्ट सवत तेंच फूल वेणींत घालून माझ्याजवळ भांडायला आली ह्मणून फारच वाईट वाटलें. (विनोदानें) बरें प्राणनाथ, त्या दिवशीं मी रागाच्या आवेशांत कांहीं दुःशब्द बोलल्यें असेन, त्याचा आपणास राग नाहीं नां ?

**कृष्ण.**—राग येईल कोठून ! भामे, तूं मला कितीही दुःशब्द बोललीस तरी कांहीं राग येणार नाहीं. कारण या जगांत मला तुजवांचून दुसरी प्रिय वस्तु आढळतच नाहीं.

इंद्र.—गोपालकृष्णा, आपण हा वृक्ष उपटूं नये, कारण आपल्या कोमल करांस श्रम होतील. मी आपणांबरोबर एक गंधर्व देतों, तो आपल्या मस्तकावर वृक्ष घेऊन द्वारकेंत पोंचवील.

कृष्ण.—फार उत्तम आहे, आतां मी गमन करतों. मी द्वारकेंत पोंचण्याचे आधीं हा वृक्ष सत्यभामेच्या दारांत लागला पाहिजे.

इंद्र.—आज्ञा महाराज. अशीच तजवीज ठेवतों. आपण गमनकरावें.

बृहस्पती.—गोपालकृष्णा, हे सर्व देव तुझे अंकित आहेत. तुझ्याच कृपेनें देवेंद्रास अमरावतीचें राज्य प्राप्त झालें आहे. सर्वोपरी तुझी कृपादृष्टी असावी अशी माझी हात जोडून विनंती आहे.

कृष्ण.—महाराज, मी यःकश्चित आहे. आपणांसारख्यांच्या कृपेनेंच आमचे पराक्रम चालतात. आपली कृपा इंद्रावर असली ह्मणजे माझी असल्याप्रमाणेंच आहे. महाराज आतां कृपादृष्टी असावी. मी गमन करतों. वंदन करतों.

सत्यभामा.—गुरूजी, मी नमस्कार करतें.

बृहस्पती.—उभयतांचें कल्याण असो. (कृष्ण गरुडावर बसून सत्यभामेसह निघून जातो व इंद्र बृहस्पतीसह निघून जातो.)

(पडदा पडतो.)

# प्रवेश १२ वा.

स्थळ—द्वारका— सत्यभामेचें मंदीर.

## पात्रें.

कृष्ण, सत्यभामा, रुक्मिणी, पेंद्या.

(सत्यभामेसहवर्तमान कृष्ण प्रवेश करतो.)

**कृष्ण.**—सत्यभामे, तुझ्या दारांत पारिजातकाचा वृक्ष लावण्याचें मी कबूल केलें होतें त्याप्रमाणें वृक्ष लावला. आतां तुझी इच्छा पूर्ण झाली नां?

**सत्यभामा.**—हें काय विचारणें? आपण हेतु पूर्ण करण्याचें मनावर घेतलें मग पूर्ण कां होणार नाहीं? (गळ्यास मिठी मारून) प्राणनाथ, मी तरी खात्रीनें असें म्हणतें कीं, जशी आपली प्रीति माझ्यावर आहे, तशी कांहीं दुसरीवर नाहीं. त्या दिवशीं नारदस्वामी पुष्पाविषयीं सांगून गेले तों ती दुष्ट सवत तेंच फूल वेणींत घालून माझ्याजवळ भांडायला आली म्हणून फारच वाईट वाटलें. (विनोदानें) बरें प्राणनाथ, त्या दिवशीं मी रागाच्या आवेशांत कांहीं दुःशब्द बोलल्यें असेन, त्याचा आपणास राग नाहीं नां?

**कृष्ण.**—राग येईल कोठून! भामे, तूं मला कितीही दुःशब्द बोललीस तरी कांहीं राग येणार नाहीं. कारण या जगांत मला तुजवांचून दुसरी प्रिय वस्तु आढळतच नाहीं.

( इतक्यांत पेंद्या व रुक्मिणी प्रवेश करतात ).

**रुक्मिणी.**—( कृष्णाचे शेवटचे शब्द ऐकून ) पेंद्या, आपल्या सोबत्याला सांग कीं, प्रियवस्तूला डोक्यावर घेऊन फिरल्याशिवाय कांहीं लोकांना समजणार नाहीं.

**पेंद्या.**—होय लुकमिन वैनी, तसें केल्यावांतून लोकांनां थमदनाल तल नाई, हें खलें.

**रुक्मिणी.**—( दोघांस पाहून आपल्याशींच ) अहाहा ! किती आनंद वहावतो आहे हा! वरांत कोणी आलें कीं काय, याची सुद्धां दाद नाहीं. ( उघड ) प्राणनाथ, माझ्याकडे पाहण्यास तरी वेळ होईल का ?

**कृष्ण.**—( रुक्मिणीजवळ जाऊन ) प्राणसखे रुक्मिणी, तूं आलीस हें मी पाहिलें नव्हतें. मी समजलों कीं, एकटा पेंद्याच आला आहे. असो. ये बैस; उभी कां राहिलीस ! ( तिच्या खांद्यावर हात टाकतो ).

**रुक्मिणी.**—( त्याला झिडकारून ) असला लाग्वटपणा मला आवडत नाहीं; दुरूनच बोला. आपण त्या सवतीच्याजवळ असतां, मी कांहीं शेजारीं बसणार नाहीं; तिच्याच पायधरण्या किती व्हायच्या असतील त्या होऊंद्या. मी आपली सहज काय चाललें आहे तें पहायला आलें होतें.

**सत्यभामा.**—कृष्णा, तूं तरी इतकीं आर्जवें कशाला करतोस ! एकादा बटकुरीसारखी उभीच कां राहिना !

**रुक्मिणी.**—कृष्णा, पहा बरें! मी इच्याजवळ बोलत नसतांही हिचा कलह करण्याचा विचार उघड दिसतो. या ठिकाणीं तूं आहेस, यासाठीं माझ्यानें कमज्यास्ती बोलवत नाहीं. नाहीं तर——

**सत्यभामा.**—नाहीं तर तूं माझें काय करणार होतीस सवती?

**कृष्ण.**—अग पण भांडण्यांत काय अर्थ आहे बरें? एकमेकींला वांकडे शब्द बोलावे हें चांगलें का?

**सत्यभामा.**—मी कशाला वांकडें बोलूं? बसणार नाहीं असें ह्मणाली, ह्मणून ह्मटलें.

**रुक्मिणी.**—यापेक्षां जरी कांहीं ह्मणालीस, तरी कोण कसें आहे, याबद्दल कृष्णच सांगेल, दुसऱ्याला नको विचारायला. असो. कृष्णा, जात्यें हो मी आतां.

**कृष्ण.**—रुक्मिणी, कां जातेस बरें? क्षणभर या ठिकाणीं बैस, आणि मी सांगतों तें ऐक.

**रुक्मिणी.**—बसणार तर नाहींच. काय सांगतोस तें आइकत्यें मात्र; सांग.

**कृष्ण.**—तुह्मी दोघी अशा मत्सरपणानें वागता यांत अर्थ काय?

**रुक्मिणी.**—मला काय विचारतोस? तिलाच विचार ह्मणजे ती सांगेल.

**पेंद्या.**—अले मला विचाल. मी थांगतों.

**कृष्ण.**—तुलारे काय ठाऊक!

पेंद्या–मी थगलें दानतों.

सत्यभामा.–कृष्णा, कोण त्रास मेला हा! घटकाभर सुद्धां माणसाला सुखानें बसूं देत नाहींत. आपल्या मंदिरांत अडमडावें हवें तर.

रुक्मिणी.–कृष्णा, मला कां उगीच अडवून ठेविली आहेस?

सत्यभामा.–कोणी अडवून ठेवली आहे कोण जाणें? आणि यायला तरी कोणी सांगितलें होतें कोणास्कळे.

रुक्मिणी.–पेंद्या, ज्या ठिकाणीं कृष्णनाथ आहेत, त्या ठिकाणीं येण्यास कोणाच्या देवाची सुद्धां मला भीति नाहीं.

कृष्ण.–रुक्मिणी, तुला मी आजपर्यंत मोठी शहाणी असें समजत होतों. पण तें सर्व व्यर्थच का!

रुक्मिणी.–मी आपली वेडी, असें कां होईना! जा म्हणून सांग म्हणजे झालें.

सत्यभामा.–कृष्णा, सांग तिला जा म्हणून. कशाला अडवली आहेस?

कृष्ण.–सत्यभामे, माझ्या मनांत, तुमच्यांतला कलह मोडावा असें आहे.

सत्यभामा.–तिच्या मनांत नसलें तर तूं काय करणार?

कृष्ण.–तुझ्या मनांत आहे का?

सत्यभामा.–मी कधीं भांडल्यें आहें! उगीच भांडणें करायला कांहीं माझें तोंड माजलें नाहीं.

**कृष्ण.**—असें जर आहे, तर तिला हांक मारून प्रेमानें बैस ह्मणून सांग.

**सत्यभामा.**—एवढा तूं सांगतोस, तरी ती बसत नाहीं. मग मी सांगितल्यावर कशी बसेल! त्यांतून मनुष्यमात्राला थोडासुद्धां अभिमान नसला तर त्यासारखा दुःखी प्राणी जगांत सापडणं नाहीं; अशी गोष्ट आहे.

**कृष्ण.**—सत्यभामे, तूं मोठी ना!

**सत्यभामा.**—होय. मोठी असल्यें ह्मणून काय झालें?

**कृष्ण.**—मोठें मनुष्य समजूतदार असतें. तिला हांक मारून बसविलीस, ह्मणजे दोघींची समजूत झाली असें मी समजेन.

**सत्यभामा.**—कृष्णा, यापेक्षांही जरी तूं मला गौरवून सांगितलेंस तरी कांहीं मी तिचें नांव घेऊन तिला हांक मारणार नाहीं.

**कृष्ण.**—( रुक्मिणीजवळ जाऊन ) प्रिये, तूं तरी तिच्याजवळ नीट बोलून दोघी एकीनें वागा, ह्मणजे मला आनंद होईल.

**रुक्मिणी.**—माझ्या मनांत जर दुजा भाव असता तर मी इच्या वरीं तरी आलें असतें का! त्यांतून तिला जर माझें नांव घेऊन हांक मारणें वाईट वाटतें, तर जळ्ळा तो अभिमान, मला मुळींचका नसावा!

**पेंद्या.**—हें बलोबल आए. ( कृष्णास ) ए लेकाच्या बायक्या, तल ऊथ माज्याबलोबल. आपन जांबुवंती वेनीकले दाऊं, ती भांदखोल नाइ काईं.

**कृष्ण.**–पेंद्या, असेंच केलें पाहिजे. ह्या दोघींकडेही येणें सोडल्याशिवाय ह्या कांहीं बेतानें वागणार नाहींत. ( दोघींस ) सत्यभामे, रुक्मिणी, तुह्मी दोघी जर एकीनें वागण्याचें कबूल करून त्याप्रमाणें वर्तणूक ठेवाल तरच ठीक आहे, नाहीं तर मी दोघींसही आजपासून वर्ज केल्या असें समजा.

**रुक्मिणी.**–कृष्णा, या तुझ्या बोलण्याचें मला मोठें आश्चर्य वाटतें. माझ्याकडे कांहीं तरी अपराध आहे का? मला जर अभिमान असता तर मी तुला शोधीत हिच्या घरीं आल्येंच नसतें; तूंच पहा बरें?

**कृष्ण.**–हेंही खरेंच आहे. ( सत्यभामेस ) भामे, सांगितल्या गोष्टीचा नीट विचार कर. एकदां गेलों ह्मणजे मग अशा भांडखोर गुणांनीं पुन: परत येणार नाहीं.

**सत्यभामा.**– ( किंचित् थांबून निरुपायानें ) बाई, बसा; एवढा वेळ उभें राहिल्यानें आपले पाय दुखूं लागले असतील.

**रुक्मिणी.**– मी कांहीं इतकी कोमल नाहीं; कीं, घटकाभर उभी राहतांच पाय दुखतील. असो. आपण बैस ह्मणून सांगतां ह्मणूनच बसयें. ( दोघी कृष्णाच्या दोहों बाजूंस बसतात. हें पाहून पेंद्या कुल्ले वाजवून आनंदानें उड्या मारतो ).

**पेंद्या.**–आतां मात्र खूप गम्मत धाली. (कृष्णास) गल्या, आतां मला एकदां पेंद्या भावोजी ह्मनाला थांग बलें दोगीना.

**सत्यभामा.**–या मेल्याचें भलतेंच कांहीं तरी.

पेंद्या.–ए दादगे, मला मेला कां म्हनत्येत? भावोजी म्हनून हांक माल.

सत्यभामा.–तूंरे कशाचा भावोजी?

पेंद्या.–तुज्या नवल्याला थोवती तो तुदा भावोजी नाइका? बोल.

रुक्मिणी.–(कृष्णास एकीकडे हळूच) प्राणनाथ, माझी एक फूल देऊन समजूत केलीत आणि हिच्या दारांत पारिजातकाचा वृक्ष आणून लावलात हें आपणांस चांगलें वाटलेंना?

कृष्ण.–प्राणसखे, जरी मी हा वृक्ष सत्यभामेच्या दारांत लावला आहे; तरी याचीं सर्व पुष्पें तुझ्याच अंगणांत पडतील. वृक्षाला घेऊन तुला काय कर्तव्य आहे? अनायासें सर्व पुष्पें तुला मिळतीलच. रुसूं नको. समजूत घे.

रुक्मिणी.–असो जशी आपली इच्छा.

पेंद्या.–कुत्र्या, धांगले या दोगीना, मला पेंद्याभावोजी म्हनाला!

कृष्ण.–(दोघींस) अग, तुम्ही दोघी एकदां त्याला पेंद्याभावोजी म्हणून त्याची इच्छा पूर्ण कां करीत नाहीं बरें?

सत्यभामा.–हा मेला सगळ्या दुनियेचा हिडिस्स, याला भावोजी म्हणून घेऊन काय करायचें आहे.

पेंद्या.–कुत्र्या बगले? तुज्या थमोल ही मला मेल्या म्हनते. पन मी भिनाल नाई हातांतल्या काथीनें तुज्या देकत बलवीन.

रुक्मिणी.–अहो पेंद्याभावोजी, इतके रागाऊं नका.

पेंद्या.–( उड्या मारून ) शाबातले पेंद्याभावोदी. लुकुमिनवैनी मी तुज्यावल नाई लागावलों.

सत्यभामा.–तर काय भावोजींचा राग माझ्यावर आहे वाटतं!

पेंद्या.–अं हं! वैनी, मी तुज्यावल देकील नाइ लागावत.

कृष्ण.–तररे कोणावर राग तुझा हा!

पेंद्या.–लेकाल्या तुज्यावल. तूं थगले थोवती थोलून इकले आलात मनून.

कृष्ण.–बरें असो. (दोघींस) तुह्मी दोघीही प्रीतीनें वागता हें पाहून मला फारच आनंद झाला आहे. आतां तुमच्या ज्या इच्छा असतील त्या मी पूर्ण करीन. सांगा, काय असतील त्या.

दोघी.–आपल्या कृपेनें सर्व अनुकूल आहेच. तरीही,—

## श्लोक.—(शालिनी).

### भरथवाक्य.

**भर्ता भार्या एकचित्तें वसोत ॥**
**दुःखक्लेशादीक कोणा नसोत ॥**
**वर्षाकालीं वर्षुनी मेघ धारा ॥**
**ईशें दीजे सर्वलोकांस थारा ॥ १ ॥**

**भामाविलास नाटक समाप्त.**

ठाणे

# ज्या लोकांनीं दहा व दहाहून जास्त प्रतींस आपला उदार आश्रय दिला आहे त्यांचीं नांवें.

| नांव. | प्रती. |
|---|---|
| रा. रा. रघुनाथ विनायक संजागिरी... | १०० |
| ,, माधवराव सखाराम... .. .. | १०० |
| डाक्टर रामचंद्र त्रिंबक शृंगारपुरे.... | ७५ |
| रा. रा. महादेव गोविंद माइनकर... | १० |
| ,, हरी महादेव फाटक... .... | १०. |
| ,, बळवंतराव पगडवंद... ... . | ३ |
| ,, नारायण मोरोबा चिपळोणकर | १० |